म. ग्रं. सं. ठाणे
१४०
१८२५

# माधवराव राघोजी रोकडे

यांचें

# संक्षिप्त चरित्र.

REFBK-0003315

लेखक

ह. अ. केळसकर.

# माधवराव रायोजी रोकडे

यांचें

## संक्षिप्त चरित्र.

ग्रं. नं. ५६३४
१०।५।२८

REFBK-0003315

ड्यु. ३७०
१०।५।२७

3394
लोकसं

ग्रं. सं. आले.

कृ. अ. केळुसकर.

मुंबई, सन १९२७ इ.

हें पुस्तक नं. ३८८ गिरगांव रोड मुंबई येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत
रा. रा. **दामोदर सांवळाराम यंदे** यांनीं छापिलें
आणि
रा. रा. **कृष्णराव अर्जुन केळूसकर** यांनीं प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

आपल्या परमपूज्य वडिलांनीं साठ वर्षांपूर्वी स्थापलेल्या शाळेला कायमचें स्वरूप दिल्यावर तिचा आणखी एक शेवटला संस्कार श्रीमती जनाबाईनीं करण्याचें योजिलें, तो अर्थात् तिचा हीरक आनंदोत्सव (डायमन्ड ज्युबिली) होय. हा उत्सव ह्या इलाख्याचे **नेक नामदार गव्हर्नरसाहेब** यांच्या हस्तें करण्याचें मनांत आणून आमचे सन्मान्य मित्र रा. रा. गोपाळ कृष्ण देवधर, एम. ए., सी. आय. ई., सर्वन्ट ऑफ इन्डिया सोसायटीचे अध्यक्ष यांच्या मदतीनें **नेक नामदार साहेब बहादुरांची** संमति मिळविली, आणि त्यांनीं ता. १ ली दिसेंबर रोजीं उत्सवसमयीं अध्यक्ष होण्याचें कृपावंत होऊन कबूल केलें. हा उत्सव करण्यास म्युनिसिपल स्कूल्स कमिटीची अनुकूलता मिळून तिचे अध्यक्ष रावबहादूर ए. के. पै, बी. ए., जे. पी. यांनीं या कामीं पुढाकार घेतला. इतकी सगळी व्यवस्था झाल्यावर ह्या उत्सवाच्या निमित्तानें शाळेच्या संस्थापकांचें लहानसें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें तर यथाप्रसंग होऊन त्या साधुपुरुषाची थोडीशी ओळख करून दिल्यासारखें होईल असें प्रकृत लेखकाला वाटलें. माधवरावांच्या चरित्राची साद्यंत माहिती मिळण्याचा मुळींच मार्ग नाहीं. थोडयाशा ऐकींव गोष्टींच्या आधारानें व स. १८८३ पासून या थोर पुरुषाची ओळख होऊन त्याच्या संबंधाची जी प्रत्यक्ष माहिती प्रकृत लेखकाला झाली होती, तिच्या आधारानें हा संक्षिप्त चरित्रलेख मोठ्या प्रेमानें लिहिला आहे. रोकडे कुटुंबानें परम प्रशंसनीय आत्मयज्ञ करून ही शाळा कशी कायम राखिली याची माहिती प्रकृत लेखकाला बरीच असून तत्संबंधानें त्याच्या

मनाला कौतुक व आदर वाटत असल्यामुळें आपल्या हातून त्याची एवढी तरी सेवा घडावी अशी त्याला उत्कट इच्छा होती. ती पूर्ण होण्याचा योग प्राप्त झाल्याबद्दल तो आपणास कृतार्थ समजत आहे. चरित्र अमळ घाईनें लिहावें लागलें, त्यामुळें माधवरावांच्या जुन्या शिष्यांच्या गांठी घेऊन कांहीं विशेष माहिती मिळविण्याची खटपट करण्यास प्रकृत लेखकास सवड मिळाली नाहीं, यामुळें हा लेख बराच अपुरा झाला आहे, याबद्दल वाचक त्याला क्षमा करितील अशी उमेद आहे.

माधवरावांनीं आपली छबी कधींहि काढूं न दिल्यामुळें ती प्रकृत लेखास जोडतां आली नाहीं; तरी त्यांच्या कुटुंबाची छबी व शाळेच्या बाबतींत जिवापाड परिश्रम केलेल्या तिघां मुलांच्या छब्या या पुस्तकांत दिल्या आहेत.

ता. १५ नवेंबर, स. १९२७
दादर, मुंबई.

कृ. अ. केळूसकर,
चरित्रलेखक.



कै. माधवराव रोकडे यांचें कुटुंब.

Lakshmi Art, Bombay, 8.

१५ २ ८०



# माधवराव राघोजी रोकडे.

ग्रं. क्र. ३३९५

## उपोद्घात.

आपल्या हातून होईल तेवढें दुसऱ्यांचें बरें करणें हें मनुष्याचें अत्यंत पवित्र कर्तव्य होय. परोपकारासाठींच केवळ हा मानवदेह आहे. परोपकारासारखें दुसरें पुण्य नाहीं. परहित साधण्याचा प्रयत्न करीत असतां कितीहि आत्मयज्ञ झाला, व स्वतांला कितीहि क्लेश सोसावे लागले तरी ज्याला परवा किंवा खेद वाटत नाहीं, तो उत्तम पुरुष होय. आपलें हित साधण्यांत दक्ष राहून दुसऱ्याचें साधेल तेवढें हित साधण्यास जो झटतो, तो मध्यमप्रतीचा मनुष्य होय. ह्या उभय प्रकारचीं माणसें मानवी प्रपंचांत थोडीबहुत निर्माण होत असतात म्हणूनच ह्या भूलोकांत थोडेसें सुखसमाधान वसत आहे. अशा माणसांची सत्कीर्ति सर्वत्र होऊन त्यांस शेंकडो हजारो माणसें दुवा मागतात, व त्यांची आठवण सहसा बुजत नाहीं.

दुसऱ्यांचें बरें करण्याचे प्रकार अनेक आहेत. कांहीं प्रकार आहेत ते दुसऱ्यांच्या शाश्वत हिताचे असतात. कित्येक प्रकार तर असे असतात कीं त्यांमुळें दुसऱ्यांचें हित होण्याऐवजीं कायमचें अहित होतें. उदाहरणार्थ गरीब लोकांना द्रव्य, अन्न व वस्त्रें यांचें दान करीत राहिल्यानें ते लोक कायमचे भिकारी बनतात, व दुसऱ्यांनीं श्रम करून

मिळवावें आणि आपण त्यांचे वांटेकरी व्हावें असें त्यांना वाटतें; आणि भिक्षा मागून उपजीवन करणें हा आपला धर्मच आहे असें ते समजतात. अशा भिकाऱ्यांच्या जाती आज कैक शतकें आमच्या समाजांत कायमच्या होऊन बसल्या आहेत. कित्येक जाती धर्माच्या नांवाखालीं वंशपरंपरागत भिक्षुक बनून राहिल्या आहेत. अन्न, वस्त्र व द्रव्य यांचें दान करून परोपकार केल्याचें पुण्य मिळवूं पाहणारांच्या पदरीं बहुशः अपात्रीं दान केल्याचें पातक कसें येतें हें यावरून ध्यानात येईल.

आतां धर्मार्थ दवाखाने व रुग्णालयें काढून लोकांवर उपकार करणाराचा क्रम वरच्याहून विशेष चांगला आहे. परंतु येथेंहि मनुष्य अविचारी व परावलंबी बनतो. रुग्णालयांच्या वगैरे खर्चासाठीं हजारो लाखो रुपये खर्चणारे उदार पुरुष त्यांतले कांहीं रुपये अज्ञान व गरीब लोकांना आरोग्य कसें राखावें याविषयींची माहिती देण्याकडे खर्चितील तर त्यांच्यांत रोगप्रसार होणार नाहीं व फुकट औषध घेण्याचा व मोफत रुग्णालयांत जाऊन पडण्याचा बराच प्रसंग टळेल. लोकास शहाणे करून रोगनिवृत्ति करणें हा परोपकाराचा प्रकार अधिक श्रेयस्कर होय.

अशा ह्या परोपकाराच्या कृत्यांहून विद्यादानरूप परोपकाराची महती किती तरी मोठी आहे. विद्याप्राप्ति घडल्यानें मनुष्याला स्वताच्या पायांवर उभें राहून स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य व हिंमत येते; आणि ह्या प्रपंचांत कसें सावधगिरीनें वागावें हें समजून रोगादि संकटांचें निवारण करण्याचें त्यांना अनुकूल होतें. यास्तव गरीब व अज्ञान लोकांत ज्ञानप्रसाराचें काम जे करितात त्यांचा परोपकार अतिश्रेष्ठ होय.

प्राचीन काळचे ऋषि व अर्वाचीन काळचे साधुसंत यांना लोकांमध्यें ज्ञानप्रसार करण्यापासून मोठें पुण्य घडतें असें वाटत असे. म्हणून ते आपल्या सामर्थ्यानुरूप हा पुण्यप्रद क्रम आमरण चालू ठेवीत. विद्या-

र्जनासाठीं ऋषींच्या आश्रमांत मुलें ठेवण्याचा परिपाठ प्राचीन काळच्या गृहस्थाश्रमी जनांचा असे. असे मुलगे आपल्या गुरूची परिचर्या करीत, आणि त्यांची विद्या झाली म्हणजे ते सामर्थ्यानुरूप गुरुदक्षिणा देत. ज्यांना सामर्थ्य नसे त्यांच्याकडून हे ऋषि कशाचीहि अपेक्षा करीत नसत.

प्राचीनकाळीं लोकसंख्या बेताची असून विवक्षित वर्णांनींच विद्यार्जन करावें असा निर्बंध असल्याकारणानें सदरील सारख्या ऋषींच्या आश्रमांनीं लोकशिक्षणाचें काम भागत असे. परंतु लोकसंख्या वाढत जाऊन विद्या संपादन करणारांची संख्या वाढत गेली, तेव्हां हे ऋषींचे आश्रम पुरतनासे होऊन लहानमोठ्या 'पाठशाळा निघाल्या, आणि त्यांत राहून अध्यापनाचें काम करणारे अध्यापक स्वचरितार्थासाठीं शिष्यवर्गाकडून, धनिकांकडून किंवा राजांकडून वेतनाची अपेक्षा करूं लागले. ह्याप्रमाणें विद्यादानाबद्दल मोबदला घेण्याचा प्रकार अधिकाधिक वाढल्यामुळें शाळा घालून मुलांना शिकविणें हा एक व्यवसायच बनून गेला; आणि त्या मानानें ज्ञानदानापासून लाभणाऱ्या पुण्यांशांत हळूहळू न्यूनता येत गेली; आणि अलीकडे ब्रिटिश रियासतींत लोकशिक्षणाची सारी जबाबदारी सरकारानें संभाळून जागोजाग शाळा व पाठशाळा काढून त्यावर पगारी शिक्षक नेमण्याचा क्रम सुरू केल्यापासून तर विद्यादान करून पुण्य संपादण्याची बुद्धिच मुळीं नाहींशी झाली आहे. त्यामुळें सरकारी किंवा लौकिक शाळांवरील बहुतेक शिक्षक आपल्या वेतनाकडेच लक्ष पुरविणारे असून तें कमी न होतां कसें वाढत राहील याच्या तजविजींत असतात. आपल्या हाताखालीं शिकणाऱ्या मुलांचें आपल्या हातून जितकें चांगलें होईल तितकें करण्याची बुद्धि फारच थोड्या शिक्षकांना असते. ह्यामुळें लोकशिक्षण व्हावें तसें चांगलें होत नाहीं. सरकारानें आरंभीं फारच थोड्या गांवांत व शहरांत शाळा घातल्या होत्या. त्यामुळें खासगी पंतोजींच्या शाळा घरांच्या ओटयांवर किंवा देवळांत पुष्कळ असत; आणि हे तात्या

पंतोजी विद्यार्थ्यांकडून साधतील तेवढे दाम मिळवून आपला गुजारा जेमतेम करीत असत; आणि तो चांगला होईनासा झाला तर ते इतर धंदे करून त्याची पूर्तता करीत. ह्याप्रमाणें योगक्षेम चालविण्याची धडपड करणारांकडून शिक्षणाचें काम कितीसें चांगलें होई याची कल्पना सहज करितां येईल. अशा पंतोजींवर कोणाचाहि दाब किंवा देखरेख नसल्यामुळें ते लहर लागेल तेव्हां मुलांना कांहींतरी शिकवीत, नाहींतर शाळेंत बसून गांवकऱ्यांशीं गप्पागोष्टी करीत, किंवा शाळा सोडून तासांचे तास किंवा सबंध दिवस कोठें तरी फिरत भटकत असत

हल्लींहि बहुतेक वरल्यासारखीच स्थिति आढळून येते. खासगी शाळांना सरकाराकडून थोडीफार मदत मिळत असते. ती अर्थात् इन्स्पेक्टरांच्या रिपोर्टांवर अवलंबून असते. तेव्हां अर्थात् ह्या इन्स्पेक्टरांना कोणत्याना कोणत्या उपायानें खुष केलें म्हणजे आपली मदत कायम होईल असा त्यांना पक्का भरंवसा असतो. ह्यामुळें उभें वर्ष नेमानें नीट शिकवीत बसण्याची दगदग न करितां वेळ मारून नेण्यापुरती थोडीशी तयारी ठेवली म्हणजे पुरे, असा त्यांचा अनुभव असतो. आतां ज्या शाळा खुद्द सरकार किंवा लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या चालवीत असतात त्यांवरील शिक्षकांचाहि क्रम वर दर्शविलेल्या पंतोजींच्या क्रमाहून फारसा भिन्न नसतो. त्यांना चांगलीं व नियमित वेतनें मिळत असूनहि त्यांच्यापैकीं बऱ्याच असामींना आपल्या कामांत कुचराई करण्याचें कांहींच वाटत नाहीं. शिक्षण देण्याचा आपला व्यवसाय अतिशयित पवित्र व उपयुक्त असून त्याच्या द्वारें आपल्या देशबांधवांचें शाश्वत कल्याण करण्याची अतिशयित अमोल संधि आपणांस प्राप्त झाली आहे, तर तिचा उपयोग इमानें इतबारें करणें हें आपलें परम पवित्र कर्तव्य आहे, अशी बुद्धि मनांत वागवून आपलें काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या फारच थोडी असते.

अशा थोड्या शिक्षकवर्गांत आमच्या चरित्र नायकाची गणना पाहिली आहे. किंबहुना पुराणांतरीं वर्णिलेल्या निरपेक्ष बुद्धीनें विद्यादान करणाऱ्या ऋषींमध्यें त्यांची गणना करण्याजोगी आहे. त्यांच्या ठायीं परोपकारीं देह झिजविण्याचा सत्संकल्प अतिदृढ वसत होता; म्हणूनच त्यांनीं स्थापन केलेली शिक्षणसंस्था आज त्यांच्या नांवानें स्थायिक होऊन राहण्याचा योग आला आहे. असा योग दुसऱ्या कोणींहि स्थापिलेल्या शाळेस क्वचितच आला असेल. कारण त्यांच्या ठायींची निःसीम परार्थबुद्धि व विलक्षण स्वार्थत्याग पाहून त्यांच्या मुलांच्या ठायीं हे दिव्य गुण कमीजास्त प्रमाणानें उतरल्यामुळें त्यांनीं त्यांची संस्था अभिमानपूर्वक आपल्या ऋषितुल्य पित्याची आठवण म्हणून कायम राखण्याचा निर्धार करून तो कितीहि संकटें आलीं तरी कदापि सोडला नाहीं. ही खरोखरीच अतिशयित कौतुक करण्यासारखी गोष्ट होय.

येथें आणखी एक विशेष रीतीनें लक्षांत वागविण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, जनांच्या उपयोगीं पडण्याचा संकल्प जे महापुरुष करितात, ते धनादिकांच्या बाबतींत कितीहि दुर्बळ असले तरी त्यांच्या हातून कधींकधीं जनहिताची अलौकिक कामगिरी होते. मोठमोठे ऋषि, धर्मप्रचारक, तत्त्वज्ञानी व साधुसंत केवळ अकिंचन होते, व कित्येक तर अनेक प्रकारीं पंगु होते. तथापि त्यांच्या औदार्यान्वित थोर कृत्यांमुळें सामान्य जनसमूहाचें कितीतरी शाश्वत कल्याण झाल्याचें आपण पाहतों. आमचे चरित्रनायक ह्याच कोटींतले महापुरुष होते, हें त्यांचें पुढील यथोपलब्ध त्रोटक चरित्र वाचणारांच्या लक्षांत येण्याजोगें आहे.

# पूर्वज व पूर्ववय.

श्री माधवरावांच्या पूर्वजाची माहिती मुळींच मिळत नाहीं. त्यांच्या घराण्यांत कांहीं कागदपत्र असल्याचें आढळून येत नाहीं. यास्तव जी कांहीं थोडीशीं माहिती दंतकथारूपानें मिळते तिचा येथें अनुवाद करण्यापलीकडे जाववत नाहीं. जुन्नरपासून तीन मैलांवर शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशीं निरगुडें म्हणून एक लहानसें खेडें आहे. हें मिनानदीच्या तीरीं आहे. या गांवीं रोकडे घराण्याची वतनवाडी व घर आहे. हा प्रांत निजामशाहीच्या अमलांत होता तेव्हां श्रीछत्रपति शिवाजी महराजांच्या मातोश्री जिजाबाईसाहेब यांचा बाप लुखजी जाधव व त्यांचे पति शहाजी राजे यांना त्या शाहींत सरदाऱ्या मिळाल्या तेव्हां त्यांनीं आपल्या पदरीं जे शिपाई व शिलेदार ठेविले त्यांमध्यें रोकडे घराण्यांतले पुरुष बरेच असावे असें मानण्यास जागा आहे. पुढें शहाजी राजांनीं आपल्या श्वशुरापुढें पळ काढीत असतां जिजाबाईंना गर्भार अवस्थेंत शिवनेरी किल्ल्यांत नेऊन ठेविलें. तेव्हां त्यांचा परामर्ष घेण्याच्या व रक्षणाच्या कामीं आसपासच्या इतर मराठे घराण्यांप्रमाणें रोकडे घराण्याचाहि उपयोग झाला असला पाहिजे; आणि शिवाजीमहाराजांच्या बारशाच्या उत्सवानिमित्त जिजामातेनें आसपासच्या खेड्यांतल्या बायांना चोळखण व त्यांच्या मुलांस कुंच्या वगैरे वांटल्या, त्यांतल्या कांहीं रोकडे घराण्यांत खास आल्या असाव्या. पुढें शहाजी महाराजांनीं निजामशाहीचें रक्षण करण्यासाठीं अदिलशाही व मोगलशाही यांच्याशीं जें अद्भुत शौर्यानें झुंज केलें त्यांत रोकडे घराण्यांतले पुरुष थोडेबहुत कामीं आले असलेच पाहिजेत; आणि पुढें शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापनेसाठीं दीर्घकाळ हुतुतु घातला त्यांतहि रोकडे घराण्यांतले पुरुष असले पाहिजेत; आणि शिवनेरी किल्ला त्यांच्या कबजांत आल्यावर त्यावर रखवालदारीचें काम रोकडे

घराण्यानें केलें असलें पाहिजे. कांहीं विशेष महत्त्वाच्या कामगिऱ्या त्या घराण्यानें केल्याचे किंवा अधिकार वहिवाटल्याचे लेख आढळत नाहींत. तरी त्या घराण्यावर त्या धामधुमीच्या काळचा संस्कार झाला होता असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. तेव्हां अशा घराण्यांत आमच्या चरित्रनायका-सारखा तेजस्वी व कर्तृत्ववान् पुरुष निपजावा हें स्वाभाविक आहे.

पुढें स्वराज्य जाऊन ब्रिटिश लोकांची सत्ता चोहोंकडे स्थापित झाल्यावर बहुतेक मराठे घराण्यांचा लष्करी पेशा जाऊन तरवारीच्या ऐवजीं नांगर हातीं आला; आणि त्यांना आपल्या जमिनींच्या उत्पन्नावर निर्वाह करणें प्राप्त झालें. परंतु अविभक्त कुटुंबव्यवस्थेच्या पायीं बहुतेक घराण्यांच्या जमिनींचे भागविभाग होऊन तीं गरिबीस आलीं. रोकडे घराण्याचीहि अशीच अवस्था होऊन आमच्या चरित्रनायकाचे आजे धर्माजीराव यांच्या वांटयाला अवघी दहा एकर जमीन आली. तिची लागवड करून ते आपल्या कुटुंबाचा जेमतेम गुजारा चालवीत असत. परंतु पुढें कांहीं आपत्प्रसंगांमुळें त्यांना जमीन लावून देऊन सावकाराचें कर्ज काढावें लागलें. त्यामुळें जमिनीचें बरेंच उत्पन्न व्याजा-दाखल सावकाराच्या घरांत जाऊं लागलें; आणि कुटुंबाचें पोषण होणें अशक्य झालें. म्हणून त्यांना दुसरा कसला तरी धंदा पाहणें प्राप्त झालें.

ह्या काळीं देश व कोंकण यांच्या दरम्यान बैलांवर माल घालून व्यापाराचें दळवळण होत असे. पुणें प्रांतांतून ही रहदारी बोरघाटानें होत असे, व अहमदनगर जुन्नर वगैरे प्रांतांतून ही रहदारी नाने घाटानें होत असे. कांहीं शेतकरी व उदमी लोक बैल व रेडे ठेवून त्यावरून आपला स्वतांचा व दुसऱ्यांचा माल कोंकणांतल्या मोठमोठ्या व्यापाराच्या शहरांत नेत असत. तेथें तो विकून घांटावर खपण्यासा-रखा माल खरेदी करून ते नेत असत. नानेघाट जुन्नर शहरापासून तेरा मैलांवर व निरगुड्यापासून दहा मैलांवर आहे; आणि तिकडचा रस्ता

निरगुड्यावरूनच गेला आहे. बैल वाहणारे व गाड्या हाकणारे निरगुडे गांवापाशीं टप्पा करीत असत. तेव्हां अर्थात् ह्या धंद्याची माहिती धर्माजीराव रोकडे यांना व त्यांचे थोरले चिरंजीव राघोजीराव याना चांगली झाली होती. म्हणून हा धंदा पतकरून आपला योगक्षेम चालवावा असें त्यांच्या मनांत आलें.

हा बैल वाहण्याचा धंदा धर्माजीराव रोकडे यांनीं फार दिवस केला नाहीं असें दिसतें. राघोजीरावांनीं मात्र तो बरेच दिवस केला. ह्या धंद्याच्या निमित्तानें त्यांना कल्याणभिवंडीस नेहमीं जावें लागत असे. कारण नानेघाटाखालीं व्यापाराचीं मोठीं शहरें हींच होतीं आणि येथून पुढें मुंबईस व्यापार होत असे. पुढें आगगाडी चालू झाल्यावर ह्या व्यापाराच्या पेठा बहुतेक बसल्या सारख्या झाल्या; तरी भिवंडीस भाताचा व्यापार करणारे मोठमोठे व्यापारी होते. ते आसपासच्या प्रांतांतून हंगामाच्या वेळीं भात खरेदी करून त्याचा तांदूळ करीत आणि तो मुंबईस वगैरे पाठवीत; आणि नानेघाटांतून जो माल देशावर जाई त्यापैकीं तांदूळ बराच असे. आगगाड्या सुरू झाल्यावर हा बैल वाहण्याचा धंदा बराच कमी झाला, आणि त्याची पैदासही पुष्कळ कमी झाली. तेव्हां राघोजीरावांनीं हा धंदा सोडून देऊन भिवंडी येथें एका मोठ्या व्यापाऱ्याकडे हमालीचें काम पतकरिलें, आणि आपल्या बायकोस तांदूळ सडण्याच्या कामास लाविलें. यानंतर पुढें ते भिवंडीस येऊन राहिले. तेव्हां माधवरावांचें वय आठ वर्षांचें होतें; आणि स. १८३९ तला त्यांचा जन्म असल्यामुळें हा थारेपालट स. १८४७ च्या सुमारास झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# माधवरावांचें शिक्षण.

भिवंडीशहर मूळची व्यापाराची मोठी पेठ असून पुढें ब्रिटिश रियासतींत तें तालुक्याचें मुख्य शहर झालें. ह्या शहरांत मुसल्मान वैगरे लोकांची वस्ती त्या वेळीं फार मोठी होती; आणि तेथल्या रहिवाशांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं अनेक खासगी शाळा होत्या. यामुळें माधवरावच्या शिक्षणाची सोय तेथें चांगली झाली; आणि ते जात्याच मोठे कुशाग्रबुद्धि व मेहनती आसल्यामुळें तेथल्या पंतोजीकडून मिळण्याजोगी सगळी विद्या त्यांनीं संपादिली. या शिवाय आणखी त्यांस उर्दू भाषेचा अभ्यास करण्याचा योग आला. तो असा: त्या वेळीं तेथ पीरजादा नांवाचा मुसलमान विद्वान् पुरुष होता. त्याची एक उर्दू शाळा होती. आमच्यां माधवरावांच्या ठायींची बुद्धिमत्ता पाहून त्यानें आपल्या शाळेंतला एक मुनशी त्यांच्या घरीं पाठवून त्यांना उर्दू भाषा शिकविली. हा मुनशी दररोज एक तासप्रमाणें सतत दोन वर्षें येत असे. हें शिक्षण त्यानें त्यांस मोफत दिलें. त्या काळीं इंग्रेजी शिकण्याची सोय फारच थोड्या शहरांत नुकती कोठें होऊं लागली होती. भिवंडीस ती मुळीं नव्हती. भिवंडीचे श्रीमंत पांढरपेशे लोक आपल्या मुलांस इंग्रेजी शिकण्यासाठीं पुण्यास किंवा मुंबईस आपले कोणी नातलग असल्यास त्यांच्या घरीं नेऊन ठेवीत. इंग्रेजी अमलांत इंग्रेजी शिकेल त्याला चांगला रोजगार मिळून किंवा त्याचा व्यवहार व व्यापार इतरांपेक्षां चांगला चालून त्याला बरकत येण्यासारखी असे. यास्तव कित्येक चाणाक्ष व माहीतगार लोकांच्या मनांत आपल्या मुलांना इंग्रेजी शिकवावें असें येऊं लागलें. राघोजीराव हेही मोठे व्यवहारज्ञ असून आसपास काय चाललें आहे हें त्यांना चांगलें समजत असे. यास्तव आपल्या ह्या अतिबुद्धिमान् मुलास थोडेंसें इंग्रजी शिकावयाला मिळेल तर हा आपलें नशीब काढील असें त्यांच्या मनांत वारंवार येऊं लागलें. शाळेंत माधवरावां-

इतका हुशार, मेहनती व चांगल्या चालीचा मुलगा कोणीहि नाहीं अशी त्यांचे शिक्षक राघोजीरावांकडे त्यांची तारीफ करीत. ती ऐकून तर त्यांच्या जिवाला सारखी हुरहुर लागून राहिली. ही त्यांची हुरहुर त्यांच्या एका मेहुणीनें दूर केली. ही माधवरावांची मावशी मुंबईस वडाच्यागादीवर धोंडकराच्या घरांत बिऱ्हाड करून होती. गोदींत व बंदरांत काम करणाऱ्या लोकांसाठीं तिनें तेथें खाणावळ घातली होती. ह्या धंद्यांत तिला बरेच पैसे मिळत. आपल्या बहिणीचा हा मोठा हुशार, गुणी व शिकलेला मुलगा आपल्याजवळ बाळगला तर तो आपल्या उपयोगीं चांगला पडेल व त्याची व त्याच्या बापाची मोठी इच्छा जी कीं त्याच्या इंग्रेजी शिक्षणाची सोय व्हावी तीहि सहजीं करितां येण्याजोगी आहे असें त्या बाईच्या मनांत आलें. राघोजीरावांनीं मनाचा निधडा करून आपला परम प्रिय मुलगा तिच्या स्वाधीन केला. तो त्या वेळीं केवळ चौदा वर्षांचा होता, तरी आई बापांना सोडून इंग्रेजी शिकण्यासाठीं मुंबईस मावशीकडे जाऊन राहण्यास तो एका पायावर तयार झाला.

वर सांगितलें आहेच कीं हा बाई वडाच्या गादीवर खाणावळ घालून होती. तिच्याकडे बरेच खाणावळी असत. तेवढ्यांचा परामर्ष घेण्याच्या कामीं आमच्या माधवरावांची तिला बरीच मदत होई. त्या काळीं नळाच्या पाण्याची सोय नसे, आणि विहीर बरीच दूर होती. माधवराव त्या विहिरींचें पाणी कावडीनें आणून देत; आणि कित्येकांच्या भाकऱ्या पोंचवावयाचेंहि काम त्याना करावें लागत असे. ह्याप्रमाणें मावशीला मदत करून फावल्या वेळीं ते विद्याभ्यास करीत असत.

त्या काळीं मुंबईस इंग्रेजी शाळा फारच थोड्या होत्या; व त्या बहुतेक ख्रिस्ती मिशनरींनीं काढल्या होत्या. हे मिशनरी आपल्या धर्माचा प्रसार व्हावा म्हणून गरीब मुलांस मोफत शिकवीत असत. गिरगांवांत

डॉ. उइल्सन नांवाच्या प्रख्यात मिशनरीनें ह्या उद्देशानें शाळा घातली होती. आमचे माधवराव ह्या शाळेंत जाऊं लागले. वडाच्या गोंदीवरून ते दररोज खेतवाडीमध्यें शाळेंत जात असत. शाळा बरीच लांब होती, तरी त्यांना इंग्रेजी शिकण्याची हौस फार असल्यामुळें दररोज एवढें चालण्याच्या श्रमाचें त्यांना कांहींच वाटत नसे. ह्या शाळेंत ते माफी असत, व गरीब मुलांना डॉ. उइल्सन साहेब अभ्यासाचीं पुस्तकेंहि पुरवीत असत, त्यामुळें माधवरावांच्या शिक्षणासाठीं त्यांच्या मावशीला कसलाच खर्च नसे. त्यांच्या कपड्यालत्त्याचा व जेवणाचा तेवढा खर्च तिला करावा लागे; आणि तोहि ती कांहीं फुकट करीत नसे. त्याचा मोबदला तिला त्यांच्या कडून वर सांगितल्यासारख्या कामाच्या रूपानें मिळत असे.

वरीं त्यांना एवढे जबर कष्ट करावे लागत तरी ते शाळेंतला अभ्यास मोठ्या नेटानें व उत्साहानें करीत असत. ते तो रात्रीचा रस्त्यांतल्या कंदिलाच्या उजेडानें करीत असत. त्यांच्याबरोबर महादेव मोरेश्वर कुंठे व अण्णा मोरेश्वर कुंठे हे त्या शाळेंत शिकत असत. असें सांगतात कीं ह्या दोघांपेक्षां आमचे माधवराव हुशार असत. अभ्यासांत त्यांची रांग नेहमीं ह्या बुद्धिमान् कुंठेबंधूंच्या वर असे. ह्या कुंठेबंधूंस पुढील उच्च शिक्षणाची सोय झाल्यामुळें ते महाराष्ट्रांत मोठे विद्वान् म्हणून नांवाजले. आमच्या माधवरावांस शेवटपर्यंत विद्याभ्यास करण्याची सोय असती तर ते त्यांच्याहूनहि विशेष नांवारूपास आले असते. महादेवराव कुंठे यांना सरकारी शाळा खात्यांत मोठ्या हुद्याची नोकरी मिळून ते पुण्यास राहूं लागले; आणि अण्णासाहेब वैद्यकीची परीक्षा देऊन मुंबईंत राहूं लागले. पुढें मुंबईंत समाधीच्या जागीं माधवरावांची शाळा आल्यावर हे अण्णासाहेब आपल्या बाळपणच्या शाळासोबत्यास वेळोवेळां येऊन भेटत असत.

हा असा इंग्रेजी शिकण्याचा योग त्यांना चारपांच वर्षे घडला. ते अमळ मोठे झाले असें पाहून त्यांच्या वडिलांनीं त्यांना भिवंडीस नेलें आणि तेथें एका व्यापाऱ्याकडे जमाखर्ची लिहिणें करावयास ठेविलें. कारण त्यांच्या वाढत्या प्रपंचास माधवरावांच्या कमाईची जोड मिळणें आवश्यक होतें.

हा मिशनरी शाळेंतल्या शिक्षणाचा संस्कार जो माधवरावांच्या मनावर झाला तो त्यांच्या पुढील चरित्रक्रमांत चांगल्या प्रकारें प्रगट झाला. दुसऱ्यांच्या कल्याणासाठीं मोबदल्याची अपेक्षा न करितां झटण्याचा जो मोठा सद्गुण त्यांच्या ठायीं विकास पावला तो ह्या संस्काराचा एक परिणाम होय. शिवाय प्रपंच मोठ्या थाटाचा साधून सुखोपभोगाची हांव धरणें केवळ व्यर्थ होय. कारण हें प्रपंचसुख क्षण-भंगुर असून दुसऱ्यांच्या अनुकूलतेनें प्राप्त होणारें असतें. यासाठीं त्याच्या नादास लागून नसती दगदग करण्यापेक्षां जें कांहीं मिळेल तेवढ्यांत समाधान मानून जेमतेम योगक्षेम चालला ह्मणजे पुरे; अशी मनाची वृत्ति झाल्यानें चित्ताची शांति नष्ट होत नाहीं. खरें शाश्वत सुख स्वकर्तव्यदक्ष व सदाचारी राहून परोपकारीं रत राहिल्यानें प्राप्त होणारें आहे अशी त्यांच्या मनाची दृढ भावना मिशनरींच्या चरित्र-क्रमावरून व त्यांच्या धर्मोपदेशावरून झाली. शिवाय ख्रिस्ती धर्माचा संस्थापक जो महासाधु येशुख्रिस्त त्याच्या उज्ज्वल चारित्र्याची जी थोडीशी माहिती त्यांना ह्या वयांत झाली होती तीवरून त्यांच्या ऋजु हृदयांत खरी प्रपंचनिवृत्ति व परोपकारार्थ देह झिजविण्याची सुबुद्धि यांचें बीजारोपण झालें होतें; आणि पुढें जी शारीरिक आपत्ति त्यांना आमरण भोगावी लागली तिच्यामुळें हा त्यांच्या हृदयावरील संस्कार दृढतर झाला.

# प्रपंचप्रवेश.

वर सांगितलें आहेच कीं त्यांना विद्याभ्यास सोडून लहान वयांतच वडिलांना प्रपंच भागविण्यास मदत करावी लागली. त सतराअठरा वर्षांचे असतां भिवंडीस जाऊन एका व्यापाऱ्याकडे कारकुनीच्या कामावर राहिले. लिहिण्याच्या कामाशिवाय आणखी पडेल तें काम त्यांना करावें लागत असे. हें सगळें काम ते मन लावून करीत असत. त्यामुळें ते आपल्या धन्यास फार आवडत असत. पुढें त्यांच्या वयाच्या एकविसावे वर्षीं त्यांचें लग्न झालें. निरगुडे गावांत विठोजी काशिबा वाघमारे नांवाचा एक गृहस्थ होता, त्याची मुलगी त्यांस केली. लग्नाच्या वेळीं त्यांचा एक पाय मुरगळला तो इतका कीं त्यामुळें मांडींत गांठ येऊन तो साफ आंखडून गेला; आणि निरगुड्याहून परत भिवंडीस जाणें म्हणून ते तेथेंच खितपत पडले. पुढें आणखी जबर विषारी ताप लागून त्यांत त्यांचा दुसरा पायहि आंखडून गेला. ह्याप्रमाणें ते दोन्ही पायांनीं साफ अधू झाले. यामुळें ते अगदीं पराधीन झाले. त्यांच्या वडिलांनीं त्या स्थितींत त्यांना भिवंडीस नेलें. तेथें त्यांची प्रकृति चांगली सुधरली, पण पायांचा अधूपणा कायम राहिला. त्याच्यावर पुष्कळ उपचार केले, पण कांहींएक उपयोग झाला नाहीं. असे ते निखालस पंगू होऊन पडले असतां त्यांचे वडील ह्या सुमारास निधन पावले. ही आणखी त्यांच्यावर अत्यंत असह्य विपत्ति कोसळली. अशा बिकट स्थितींत त्यांनीं धैर्य न सोडतां स्वसंरक्षणाचा एक उपाय योजला. तो असा कीं, त्यांनीं आपल्या बिऱ्हाडाच्या ओटीवर शाळा घातली. तींत पहिल्या पहिल्यानें फारच थोडीं मुलें येत; आणि त्यांत फी देणारीं तर फार थोडीं असत. ह्यामुळें त्यांची आरंभी बरीच निराशा झाली. परंतु पुढें त्यांची हुशारी व उत्कृष्ट शिक्षणशैली लोकांच्या निदर्शनास हळूहळू येऊं लागून त्यांच्या ओटीवर मुलांचा

बरीच गर्दी होऊं लागली; आणि त्या मानानें त्यांचें उत्पन्नहि बरेंच वाढलें. आपण निखालस पंगू असल्या कारणानें आपणांस ह्या शिक्षणाच्या उद्योगाशिवाय दुसरा कोणताहि उद्योग व्हावयाचा नाहीं हें त्यांच्या ध्यानांत येऊन ते ता अगदीं मन लावून करीत असत. मुलांना मोठ्या ममतेनें व मधुर वाणीनें ते शिकवीत. मुलांस आपण आवडावें व आपल्या हातून त्यांचें चांगलें शिक्षण व्हावें असें करण्यास ते मनापासून झटत. त्यामुळें त्यांच्या शाळेंत लहान मुलांस जाऊन बसण्याचा कंटाळा किंवा भीति मुळीं वाटत नसे.

ह्याप्रमाणें ते चांगले लोकप्रिय होऊन शिकणाऱ्या मुलांनाहि आवडूं लागले. असें त्यांचें बस्तान चांगलें बसतें न बसतें तों त्यांच्या आईनें त्यांना व त्यांच्या कुटुंबाला घरांतून हाकून लाविलें. ही बाई कडक स्वभावाची असल्यामुळें तिचें व त्यांचें जमत नसे ती त्यांच्याशीं नेहेमीं कांहीं ना कांहीं कारणावरून कलह करीत असे. तो एके दिवशीं अशा रीतीनें विकोपास गेला. तेव्हां त्यांना बिऱ्हाड व शाळा यांसाठीं दुसऱ्या कोठेंतरी घर शोधावें लागलें. त्या वेळीं त्या शहरांत एक जुनें घर वर्षांचीं वर्षें पडून होतें. कारण तें भूतांनीं पछाडलें असून त्यांत कोणी वसति करावयास गेलें तर भूतांच्या भीतीमुळें त्याचा तेथून लौकरच उठावा होत असे. ह्यामुळें त्यांत कोणी राहत नसत. ह्या घराच्या ओटीवर त्यांनीं आपली शाळा नेली. त्यांच्या आईनें त्यांना व त्यांच्या बायकोला चिरगूट पांघरूण वगैरे कांहींएक न देतां हाकलून दिलें होतें. शिवाय शाळेचें जें कांहीं उत्पन्न येई तें सगळें ते तिच्याकडे देत असत, त्यामुळें ते घरांतून निघाले तेव्हां त्यांच्यापाशीं एक पैसाहि नव्हता. पण सदरील घरांत शाळा नेल्यावर दुसरे दिवशीं मुसलमानांचे दोन नवीन मुलगे शाळेंत आले. त्यांनीं दोन दोन पायल्या तांदूळ आणि एक एक रुपया त्यांस दिला. ही अशी अनपेक्षित देणगी

त्यांना ह्या ऐन संकटाच्या वेळीं मिळाल्यामुळें त्यांचा उपासमार टळला व त्यांना पंचे व बंडीला कापड विकत घेतां आलें. त्यांच्या वडिलांचे व त्यांचे स्वतांचे ओळखीचे लोक येऊन त्यांचा परामर्ष घेऊं लागले; आणि ते चांगले शिक्षक असल्याबद्दल त्यांची चोहोंकडे ख्याति होण्यास विलंब न लागून त्यांच्या शाळेंत अधिक अधिक मुलें येऊं लागलीं. पहिल्यापहिल्यानें कायस्थ, ब्राह्मण वगैरे पांढरपेशे लोक, आपलीं मुलें हा शिक्षक कुणबट आहे असें समजून त्यांच्या शाळेंत पाठवीत नसत. परंतु त्यांच्या ठायींची बुद्धिमत्ता, विद्वत्ता व विद्यादान-कौशल्य हीं त्यांच्या प्रत्ययास येऊन हे पांढरपेशे लोक भेदभाव विसरून जाऊन त्यांच्या शाळेंत आपलीं मुलें बिनदिक्कत पाठवूं लागले; आणि लंगड्यापंतोजीची शाळा शहरांतल्या इतर शाळांहून चांगली असें लोकांना वाटूं लागलें. परंतु त्यांचें उत्पन्न मात्र त्या मानानें म्हणण्यासारखें वाढलें नाहीं. कारण मुलांनीं देऊं केलेल्या फीची वसुली करण्याच्या कामीं त्यांची बरीच ढिलाई असे; आणि कित्येक गरिबांच्या मुलांकडून कसली फी घ्यावयाची ? असें त्यांना वाटे. आपल्या गरीब ज्ञातिबांधवांकडून सक्तीनें फी वसूल करून आपण गबर होण्याची बुद्धि त्यांच्या मनाला तर कधींहि शिवली नाहीं.

हें शिक्षकाचें काम करून जी फुरसद मिळे ती ते विद्याध्ययनात चालवीत असत. आध्यात्मिक, ऐतिहासिक व काव्यमय ग्रंथ प्रयासानें मिळवून मोठया उत्कंठेनें वाचण्याचा त्यांना नाद असे. त्या वेळीं हल्लींच्या इतकी ग्रंथसंपत्ति मराठी भाषेंत नव्हती; तरी जेवढी कांहीं उपलब्ध होण्याजोगी होती तेवढी सगळी त्यांनीं थोड्याच अवकाशांत वाचून टाकिली. त्यांची स्मरणशक्ति उत्कृष्ट असल्यामुळें जें कांहीं तें वाचीत त्याचें त्यांना चांगलें स्मरण राही, आणि कोणत्याहि विषयावर जें कांहीं ते वाचीत किंवा ऐकत त्याचा विचार ते स्वतंत्रपणें करून

खऱ्याखोट्याचा निवाडा आपल्या बुद्धीनें करीत. परप्रत्ययनेयबुद्धि त्यांच्या ठायीं मुळीं नसे. ह्यामुळें त्यांच्या बुद्धीला चांगली प्रखरता आली होती.

ह्या अशा त्यांच्या ठायींच्या योग्यतेमुळें त्यांच्याकडे घटका दोन घटका बसून एकाद्या विषयावर बोलत बसणें मोठें हिताचें आहे असें जिज्ञासु लोकांना वाटे, आणि त्यांच्या ओटीवर कोणीना कोणी येऊन त्यांच्याशीं बोलत बसे. त्या शहरांत त्या काळीं कांहीं शिकलेल्या लोकांनीं सभा वगैरे स्थापून व्याख्यानें देण्याचा उपक्रम केला होता. नेहमीं कोठें ना कोठें सभा भरून तींत नाना लौकिक विषयांवर भाषणें होत. आमच्या माधवरावांना असलीं व्याख्यानें ऐकण्याची हौस मनस्वी असे. त्यांना चालतां मुळीं येत नसे, तरी आपल्या मित्रांच्या व शिष्यांच्या मदतीनें गाडींत बसून व्याख्यानाच्या ठिकाणीं ते मोठ्या उत्साहानें जात व सवड मिळाल्यास एकाद्या विषयावर भाषणहि करीत. त्यामुळें त्यांच्या ठायीं वक्तृत्वशक्ति वाढून ते चांगले वक्ते आहेत अशी त्यांची ख्याति झाली. अल्पवयापासून त्यांना वाचनाचा चांगला नाद होता; आणि पंगुत्व आल्यापासून विद्याव्यासंगावांचून त्यांना कालक्षेप करण्याचें दुसरें साधनच उरलें नव्हतें. ह्यामुळें त्यांची नानाविध विषयांवरील माहिती वाखाणण्यासारखी होती; आणि ही माहिती मुद्देसूद व मनावर ठसे असें भाषण करून लोकांपुढें मांडण्याची शैली त्यांच्या अंगीं फारच चांगली विकास पावली होती.

## मुंबईस आगमन.

ह्याप्रमाणें भिवंडी शहरांत ते उत्तम शिक्षक, मोठे विद्वान् व चांगल्या प्रतीचे वक्ते असल्याबद्दल पुष्कळ लौकिक झाला. जुन्नर वगैरे प्रांतांतून जे मराठे गृहस्थ मुंबईस धंदारोजगारानिमित्त त्या काळीं येत ते बहुतेक नानेघाटावरून खालीं उतरून कल्याणभिवंडीच्या वाटेनें

येत. त्यांचे कांहीं नातलग गांवकरी भिवंडीस धंदारोजगार करून कायमचे राहत. त्यांच्या विऱ्हाडीं हे मुंबईस जाणारे लोक मुक्काम करीत. तेव्हां अर्थात् आमच्या माधवरावांचा लौकिक त्यांना ऐकावयास मिळे. कांहीं जणांशीं तर त्यांची प्रत्यक्ष ओळखहि झाली होती. आपल्या ज्ञातींत हा असा विद्वान् , शहाणा व हुषार मनुष्य निपजावा, आणि बुद्धिमत्ता, विद्वत्ता व वक्तृत्व ह्या गुणांनीं त्यानें पांढरपेशांसहि मागें काढावें याबद्दल त्यांना मोठें कौतुक व अभिमान वाटे; आणि हा चांगला शिक्षक असून पंगुत्वास्तव ह्याला शिक्षणाच्या धंद्याशिवाय दुसरा कोणताच धंदा व्हावयाचा नाहीं असें त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं त्यांना मुंबईस नेऊन ठेवण्याचा बेत केला; आणि त्यांनीं त्यांना अनेक गोष्टी सांगून व पुष्कळ लालूच दाखवून मुंबईस आणलें.

मुंबईस आल्यावर त्यांनीं प्रथम चिंचबंदर येथें मारुतीच्या देवळाच्या ओटीवर शाळा मांडली. हें देऊळ देशस्थ मराठ्यांचेंच होतें. हे प्रथम बंदरांत काम करणाऱ्या मराठ्यांच्या आश्रयानें तेथें राहिले. परंतु त्यांच्या शाळेंत मुलें पुष्कळ येऊं लागल्यामुळें ती जागा पुरेनाशी झाली. तेव्हां बंदरकरांनीं त्यांची शाळा रघुनाथबावांच्या समाधीच्या जागीं नेण्याचें योजिलें. परंतु ह्या त्यांच्या योजनेस मार्केटकर मराठे मंडळी कांहीं दिवस अनुकूळ झाली नाहीं. कारण त्यांच्यामध्यें कांहीं कारणामुळें दुफळी होती. पण ती लौकरच मिटून आमच्या माधवरावांस समाधीच्या जागीं आपली शाळा आणतां आली. ह्या जागीं ते शेवटपर्यंत राहिले.

त्यांच्या शाळेंत येणारीं मुलें बहुतेक गरिबांचीं असल्यामुळें त्यांना फीचें उत्पन्न अगदीं बेताचें होऊं लागलें; आणि शाळा वाढत गेल्यामुळें मदतीस दुसरे शिक्षक ठेवल्यावांचून गति नव्हती. ही अडचण पाहून ज्यांनीं त्यांना मुंबईस आणलें त्यांपैकीं कांहीं जणांनीं आपसांत वर्गणी

काढून दरमहा तीस रुपये त्यांना पोंचतील अशी व्यवस्था केली. ह्या मदतीच्या आधारावर त्यांना आणखी तीन शिक्षक आपल्या मदतीसाठीं नेमतां आले. ही मासिक मदत त्या गृहस्थांनीं आठनऊ वर्षे केली. ही मदत बंद होण्याचें कारण असें झालें कीं माधवरावांनीं मुंबईस आल्यावर देशस्थ मराठासमाजाची मोठ्या युक्तीनें संघटना करून त्यांच्यांतील कलहाचीं कारणें नाहींतशीं केलीं. त्याप्रमाणेंच धर्मस्थानाच्या व्यवस्थेंत हात घालून ती अशी चांगली केली कीं त्यामुळें त्यासंबंधानें होणारें सरकारदरबार चुकून मतलबी लोकांचा डाव हुकला. ही अशी त्यांची निराशा झाली असून आणखी माधवरावांची छाप व वजन सगळ्या समाजावर बसलें. ही गोष्ट कांहीं उपद्व्यापी व मतलबी लोकांस न आवडून त्यांनीं माधवरावांस शाळेसाठीं मिळणारी मदत बंद करण्याचें अपयश स्वीकारलें! हा असा आश्रय तुटल्यामुळें माधवरावांना मोठें सांकडें पडलें. शाळेंत मुलें पुष्कळ असून त्यांचे सरकारी नियमाप्रमाणें निरनिराळे वर्ग करून त्यांवर निरनिराळे शिक्षक ठेवणें प्राप्त होतें. एरवीं सरकाराकडून मदत मिळूं लागली होती ती चालू राहण्याची आशा नव्हती. निरनिराळ्या इयत्ता करून त्यांचे ठरलेले अभ्यासक्रम पुरे केल्यावांचून शाळा तपासणारे सरकारी अधिकारी शाळा मदतीस पात्र आहे अशी शिफारस करीत नसत. ह्या कारणास्तव वर सांगितल्याप्रमाणें लोकांची मदत बंद पडली तरी शाळेंतले शिक्षक कमी करितां येणें शक्य नव्हतें. कारण असें केल्यानें सरकाराकडून मिळणारी मदतहि बंद पडणार होती. अशा रीतीनें इकडे आड व तिकडे विहीर असा पेंच आला. तेव्हां त्यांतून पार कसें पडावें ही काळजी माधवरावांस लागली. शाळेची फी वाढवितां येणें तर मुळीं शक्य नव्हतें. जी फी ते घेत तीच देण्याचें सामर्थ्य पुष्कळ आईबापांस नसे; त्यामुळें बऱ्याच मुलांस त्यांना माफी द्यावी लागत असे, आणि जीं मुलें फी देणारीं ह्मणून असत, त्यांतलीं बरींच नेमानें

दर महिन्याच्या महिन्यास फी देत नसत. कित्येकांकडे तीन तीन चारचार महिन्यांची फी तुंबत असे. असें असे तरी सक्तीनें फी वसूल करण्यास त्यांचें मन घेत नसे. फी न दिल्यामुळें कोणाहि मुलास शाळेंत येण्याचें बंद करण्याइतका कठोरपणा ते केव्हांहि दाखवीत नसत. ही अशी त्यांची वृत्ति असल्यामुळें फीचें उत्पन्न कधींहि चांगलेंसें नसे. त्यांच्या शाळेंत शेंकडा पन्नास मुलें महिन्याचे महिने फुकट शिकत; आणि कांहीं मुलें तर अशीं असत कीं तीं फी बुडवून शाळेंत येण्याचीं बंद होत असत !

ही अशी वाईट स्थिति होती तरी त्यांनीं कधींहि धीर सोडला नाहीं व आपला नेहमींचा क्रम बदलला नाहीं. त्या बिकट स्थितींतून थोडें बहुत मुक्त होण्याचा एक उपाय त्यांना सुचला. तो असा कीं त्यांनीं आपल्या बायकोस व एक दोन मुलींस भाजीपाला विकावयाचा धंदा करावयास सांगितलें. आतांप्रमाणें त्याहि वेळीं मराठे, माळी वगैरे गृहस्थांच्या बायका भाजीपाला विकून उदरनिर्वाह करीत असत. तेव्हां अर्थात् हा धंदा आपल्या बायकोनें व मुलींनीं केला तर त्यांत कांहीं कमीपणा नाहीं असें त्यांना वाटलें. वास्तविक पाहतां त्यांची योग्यता त्या काळीं फारच वाढली असून त्यांस मोठमोठे विद्वान् व धनवान् पुरुष मानीत असत. तेव्हां त्यांनीं आपल्या बायकोला असला हलका धंदा करावयास लावणें बरोबर नाहीं असें वाटणें साहजिक होतें; आणि आमचे माधवराव मोठे मानी असून आपली खरी योग्यता जाणून होते. परंतु आपला अंगीकृत व्यवसाय जो विद्यादानाचा त्याला व्यत्यय येण्यापेक्षां आपणांला कोणीं अकिंचन ह्मटलें तर त्याची परवा नाहीं असा त्यांनीं सुविवेक केला होता. शिवाय पुरुषांप्रमाणें बायकांनींहि उदरनिर्वाहाचा कांहीं तरी चांगला व प्रामाणिकपणाचा उद्योग करण्यांत मुळींच कमीपणा नाहीं असें त्यांचें मत असे.

त्यांची गृहिणी व मुलें त्यांची खरी योग्यता व त्यांनीं चालविलेल्या व्यवसायाचें खरें महत्त्व चांगलें ओळखून होतीं. यास्तव तीं त्यांना नेहमीं परमपूज्य मानून त्यांच्या आज्ञेंत मोठ्या प्रेमानें व उत्साहानें वागत असत. त्यांच्या पंगुत्वास्तव किंवा अकिंचनत्वास्तव त्यांचा तीं कधींहि तिरस्कार किंवा कंटाळा करीत नसत. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांची बायको व एक दोन मुली दररोज भाजी विकीत, आणि त्यांत जी कांहीं पैदास होई तींत कुटुंबाचा जेमतेम खर्च भागवीत. अशी त्यांच्याकडून मदत होऊं लागल्यामुळें माधवरावांना फीच्या सगळ्या उत्पन्नाचा विनियोग मदतनीस शिक्षकांस वेतनें देण्याकडे करितां येऊं लागला. या उत्पन्नांतून त्यांना कधीं कधीं छदामही उरत नसे. तरी पण ते यत्किंचितृहि निरुत्साह किंवा नाराज न होतां मोठ्या उत्साहानें व आस्थेनें आपलें शिक्षणदानाचें काम करीत असत. आपली शाळा कायम राहून तिच्या द्वारें गरिबांच्या मुलांस साक्षर होण्यास मदत होत आहे हें मनांत आणून त्यांत ते आपणांस कृतार्थ मानीत.

ही अशी त्यांची बिकट स्थिति आमरण कायम होती, तरी ते कधींहि निराश किंवा उदास नसत. आपण अंगीकारलेलें सत्कार्य निश्चयपूर्वक व निरलसपणें करण्यांत त्यांच्या चित्ताला समाधान वाटे. दुसरें असें कीं त्यांना नित्यशः असें वाटे कीं आपण सर्वथा पंगू असून आपल्या हातून ही लोकसेवा घडत आहे यांत आपलें जीवित सार्थकीं लागत आहे. अशी त्यांच्या मनाची दृढ भावना असे. आपल्या श्रमाचा कांहीं योग्य मोबदला मिळत नसल्याबद्दल त्यांना कधींहि खिति वाटत नसे.

३३९४

# त्यांच्या शाळेची प्रख्याति.

भिवंडीस असतां त्यांच्या शाळेचा व त्यांचा स्वतःचा लौकिक झाला होता. तसाच तो मुंबईंत होण्यास विलंब लागला नाहीं. डोंगरी, चिंचबंदर, क्रॉफर्ड मार्केट वगैरे ठिकाणच्या मराठे वगैरे ज्ञातींतल्या कुटुंबांत त्यांच्या शाळेचा लौकिक पुष्कळ पसरला होता. त्यांच्या शाळेंत इतर ठिकाणचींहि मुलें येत असत. ह्यामुळें लंगड्या-पंतोजीच्या शाळेचा उपयोग पुष्कळ गरीब कुटुंबांना होत असे. कोणी कसाहि आडदांड किंवा निर्बुद्ध मुलगा असला तरी तो माधवरावांच्या शाळेंत येऊन शिकूं लागला म्हणजे खात्रीनें सुधरावयाचा. ते प्रत्येक मुलाशीं मोठ्या ममतेनें बोलत असत, तरी त्यांची शिस्त अशी कांहीं कडक असे कीं कोणालाहि ती मोडून गैरशिस्तपणें वागण्याचें धैर्य होत नसे. ह्यामुळें मुलांना चांगलें वळण लागून पुढें प्रपंचांत त्यांचें पुष्कळ हित होत असे. त्यांची शिकविण्याची पद्धत उत्कृष्ट असल्यामुळें त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या मुलांचा कायमचा फायदा होत असे. ह्या त्यांच्या शिक्षणाची आठवण त्यांना आमरण राही. त्यांचे पुष्कळ शिष्य आजमितीला हयात असून ते त्यांची आठवण मोठ्या प्रेमानें व आदरबुद्धीनें काढीत असतात.

त्यांचा आणि त्यांच्या शाळेचा लौकिक शहरांतल्या इतर भागांतहि लौकरच पसरला. मांडवींत वडाच्या गादीवरील रघुनाथ बावांच्या समाधीच्या जागीं एका मोठ्या हुशार व विद्वान् मराठा गृहस्थानें खासगी शाळा उत्तम प्रकारें चालविली असल्याची माहिती पांढरपेशे लोकांतहि पसरली; आणि त्या काळचे नामांकित हिंदु गृहस्थ त्यांची शाळा मोठ्या कौतुकानें पाहावयास येत. त्यांचे बाळपणचे सहाध्यायी डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे, डॉ. सदाशिवराव वामन उर्फ बाळा भाऊ काणे, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख, वे. शा. राजाराम शास्त्री भागवत, न्यायमूर्ति

काशीनाथ त्रिंबक तेलंग, न्यायमूर्ति नारायण गणेश चंदावरकर, रा. रा. नारायण विष्णु साठे, रा. रा. सदाशिवराव केळकर, रा. रा. वामन आबाजी मोडक वगैरे थोर पुरुष त्यांच्या शाळेंत वारंवार येऊन त्यांचें उत्कृष्ट काम पाहून त्यांची वाखाणणी करीत; व त्यांच्याशीं अनेक विषयांवर संवाद केल्यावर त्यांची अशी खात्री होई कीं हे मोठे विवेकशील व बहुश्रुत गृहस्थ असून शिक्षकाच्या कामाला अगदीं योग्य आहेत; आणि त्यांची निःसीम परार्थपरायणता व अंगीकृत कार्याच्या सिद्धिसाठीं दृढनिश्चयानें आत्मयज्ञ करण्याची त्यांची तयारी पाहून ते त्यांचा गौरव करीत. माधवराव आपल्या शाळेचे बक्षीससमारंभ प्रतिवर्षी करीत. तेव्हां वर सांगितल्यासारख्या मोठ्या वजनदार गृहस्थांना अध्यक्ष होण्याविषयीं ते विनंति करीत. अशा प्रसंगीं आपण काय करीत आहों याची माहिती लोकांना देण्याची संधि ते साधीत असत; आणि इंदुप्रकाश, प्रभाकर, दीनबंधु, सुबोधपत्रिका वगैरे वर्तमानपत्रांत शाळेची माहिती प्रसिद्ध होऊन ह्या पंगु पण महामनस्क व परोपकारी सद्गृहस्थाच्या सत्कार्याची वारंवार तारीफ होत असे; आणि हे असे रोकडे कोण आहेत व त्यांची शाळा कशी आहे तें पाहण्याच्याच केवळ बुद्धीनें त्यांच्याकडे कैक लोक येत असत. सरकारी तपासनीस त्यांच्या शाळेची तपासणी प्रतिवर्षी करून त्यांची व त्यांच्या कामाची आपल्या रिपोर्टांत नेहमीं वाहवा करीत असत.

प्रकृत लेखकाला माधवरावांचें दर्शन प्रथम स. १८८३ त घडलें. त्यांच्या शाळेचा बक्षीससमारंभ होता; आणि त्या काळचे अत्यंत नामांकित गृहस्थ रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख हे अध्यक्षस्थानीं विराजमान होणार असें ऐकून प्रकृत लेखक समारंभाला गेला. त्या प्रसगीं माधवरावांची तेजस्वी मुखश्री व इतर चालचर्या पाहून त्याची अशी भावना झाली कीं हा पुरुष पंगू नसता व ह्याला विश्वविद्यालयांतील शिक्षणाचा संस्कार झाला असता तर यानें त्या वेळच्या मोठ्या

नामांकित विद्वानांशीं बरोबरी केली असती. त्यांची ती वक्तृत्वपूर्ण सरस व अत्यंत शुद्ध वाणी ऐकून तो केवळ मोहित झाला; आणि अशा थोर मनाच्या व बुद्धिमान् पुरुषाच्या संगतीनें राहून त्याच्या उत्कृष्ट गुणांचा लेशमात्र आपल्या अंगीं उतरेल तर तो आपणाला धन्य समजेल असें त्याला होऊन गेलें. माधवरावांनीं सदर समारंभाच्या वेळीं कांहीं मुलांना वाचावयास सांगितलें, व कांहीं मुलींना आणि त्यांना तत्संबंधाचे कांहीं प्रश्न विचारिले ते अशा उत्तम व मोहक स्वरानें व शैलीनें विचारिले कीं त्यांवरून प्रकृत लेखकाची अशी समजूत झाली कीं ह्या थोर पुरुषानें वक्तृत्वकलेचा कैक वर्षें अभ्यास केला असावा. त्या वेळीं त्यांनीं आपल्या कांहीं मुलांचीं अक्षरें अध्यक्षांना दाखविलीं; तीं पाहून प्रकृत लेखकाची अशी खात्री झाली कीं शिक्षकाच्या अंगीं खरें कौशल्य असेल तर तो कोणत्याहि प्रकारच्या विद्यार्थ्याचें अक्षर उत्तम सुधरील. प्रकृत लेखक त्या वेळीं शिक्षकाचा धंदा करीत असल्यामुळें त्याच्या मनावर ह्या गोष्टीचा परिणाम विलक्षण झाला. ह्या समारंभाच्या वेळीं रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख यांनीं आपल्या भाषणांत आमच्या माधवरावांची प्रशंसा उत्कृष्ट प्रकारें करून त्यांची तुलना प्राचीन ऋषिवरांशीं केली आणि म्हटलें कीं आमच्या देशाला ऊर्जितावस्था यावयाला रा. माधवराव रोकड्यांसारखे उत्तम शिक्षक जितके निर्माण होतील तितके थोडेच आहेत. पदरीं गरिबी असतां वाढत्या कुटुंबाचा निर्वाह होण्याइतकेहि दाम मिळण्याची मारामार असतां त्यांनीं हा लोकशिक्षणाचा व्यवसाय मोठ्या उत्साहानें चालविला आहे. ही गोष्ट खरोखर कौतुक करण्यासारखी आहे. यांचें हें उज्ज्वल उदाहरण आमच्या शिक्षकवर्गानें घेण्यासारखें आहे. केवळ वेतनाकडे दृष्टि ठेवून काम करणारे शिक्षक पुष्कळ आहेत. अशाच्या हातून चांगलें शिक्षण व्हावयाचें नाहीं. तर आपल्या स्वाधीन केलेलीं मुलें आपल्या देशबांधवांचीं आहेत, किंबहुना तीं आपलींच आहेत

असें जनांत वागवून त्यांचें शिक्षण आपल्या हातून होईल तितकें चांगलें करण्यास जे शिक्षक मनापासून झटतात आणि आपणांस आपल्या श्रमाचा मोबदला किती मिळतो याकडे लक्ष पुरवीत नाहींत, तेच आमच्या देशांत शिक्षणप्रसार करण्यास लायक आहेत, व अशांची आम्हांस आज आवश्यकता आहे. गुरुश्रेष्ठ माधवराव अशा कोटींतले शिक्षक आहेत. याबद्दल त्यांचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडें. रा. ब. देशमुखांनीं केलेल्या अशा आशयाच्या भाषणाचा परिणाम प्रकृत लेखकाच्या मनावर होऊन त्यानें आपलें आचरण त्या उपदेशाप्रमाणें ठेवण्याचा निर्धार केला व तो पुढें चाळीस वर्षें यथाशक्ति चालविला.

असाच एक दुसरा प्रसंग प्रकृत लेखकास आठवत आहे. प्रख्यात विद्वद्रत्न न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग यांना आमच्या माधवरावांनीं आपल्या शाळेच्या समारंभाचे अध्यक्ष होण्यास बोलाविलें होतें. त्या वेळीं प्रकृत लेखक हजर होता. तेलंगांनीं त्यांच्या शाळेची सगळी माहिती मिळवून व मुलांची प्रत्यक्ष चांचणी करून असे आश्चर्योद्गार काढले कीं असल्या प्रकारची शाळा माझ्या साऱ्या जन्मांत मला पाहावयास मिळाली नाहीं. प्राचीन काळच्या गुर्वाश्रमांचें वर्णन आम्हीं पुराणांतरी वाचतों, परंतु आज त्याचा थोडासा मासला मला प्रत्यक्ष पाहावयास मिळाला. माधवरावांच्या निरपेक्षत्वाची केवळ कमाल आहे. आपल्या सामर्थ्यानुरूप लोकांच्या कल्याणार्थ आपला देह झिजविण्यांतच यांना धन्यता वाटत आहे. यांची जुन्या काळच्या साधुसंतांशीं तुलना करण्यास मुळीं हरकत नाहीं. असले महामनस्क पुरुष सर्व लोकांस वंद्य आहेत. यांचें मला आज दर्शन घडलें हें मी माझें मोठें भाग्य समजतों. हे त्यांच्या तोंडचे प्रशंसापर उद्गार ऐकून प्रकृत लेखकाच्या डोळ्यांतून प्रेमाश्रुधारा गळल्या आणि येथून पुढें आपल्या हातून असेंच कांहीं तरी देशकार्य व्हावें अशी इच्छा त्याला झाली. परंतु माधवरावांच्या सारखा पुण्यप्रद योग त्याला घडला नाहीं.

माधवरावांच्या हाताखालीं शिकून पुढें प्रपंचांत प्रवेश केलेल्या शेंकडो विद्यार्थ्यांस आज मितीला त्यांची आठवण राहिली असून ते आपणांस त्यांचे केवळ ऋणी समजत आहेत. अशा पुष्कळ गृहस्थांची नांवें मला कळलीं आहेत. परंतु तीं येथें देणें प्रयोजक नाहीं. शिवाय येथें थोड्यांचीं ठाऊक आहेत तेवढीं नांवें देऊन इतरांचीं माहीत नाहींत म्हणून सोडून देणें हेंहि ठीक नाहीं. इतकें मात्र खास सांगतां येण्याजोगें आहे कीं त्यांनीं दिलेल्या शिक्षणाच्या केवळ आधारावर पुष्कळ लोक अनेक प्रकारच्या धंद्यारोजगारांत चांगली बरकत पावले आहेत आणि त्यांच्या विषयींचा पूज्यभाव व कृतज्ञताबुद्धि त्यांच्या हृदयांत कायम राहिली आहे.

## लोकहिताची इतर कामगिरी.

मागें सांगितलेंच आहे कीं ते भिवंडीस असतां त्यांच्या विद्वत्तेची व बहुश्रुतत्वाची ख्याति ऐकून अनेक लोक त्यांच्याकडे वारंवार येऊन नाना विषयांवर चर्चा करीत व अनेक बाबतींत त्यांची सल्ला मसलत विचारीत. असाच प्रकार ते मुंबईस आल्यावर सुरू झाला. समाधीच्या प्रशस्त जागीं त्यांनीं आपली शाळा आणून तेथेंच बिऱ्हाड केल्यामुळें पुष्कळ लोकांना त्यांच्याकडे येऊन बसण्याची व संभाषण करण्याची सोय झाली. त्यांचा नेहमींचा क्रम असा असे कीं शाळेच्या वेळीं त्यांच्याकडे कोणी बोलावयास आला तर त्याला ते शाळेच्या वेळेपूर्वीं किंवा शाळा सुटल्यावर यावयास सांगत. त्यांच्या आसपास बहुतेक अशिक्षित लोकांची वसति असे. सुशिक्षित पांढरपेशांची वसति अमळ दूरच्या भागीं असून त्यांना माधवरावांसंबंधानें फारशी माहिती नसे, व ज्यांना ती असे त्यांस त्यांच्याकडे येऊन कोणत्याहि विषयावर

चर्चा करण्याचें प्रयोजन वाटत नसे. तथापि ज्या थोड्या शोधक लोकांस त्यांची खरी योग्यता कळत असे ते त्यांच्याकडे वारंवार येऊन अनेक विषयांवरील त्यांचीं मतें काय आहेत तें समजून घेत असत; आणि त्यांच्या सरळ व शुद्ध विचारसरणीची व विविधविषय-ज्ञानाची ते तारीफ करीत असत.

मराठे वगैरे मागसलेल्या वर्गांतले जे कांहीं लोक त्यांच्याकडे हरएक बाबतींत सल्लामसलत विचारावयास येत असत, त्यांचे तंटेबखेडे उपस्थित झाले असतां कायद्याची सल्ला घेण्यासाठीं त्यांच्याकडे ते येत, आणि माधवराव कायद्यांचीं पुस्तकें वाचून त्यांस योग्य सल्ला देण्यास मुळीं आळस करीत नसत. ह्यामुळें वकिलाच्या तावडींत सांपडून न्याय-कचेऱ्यांतून तंटे लढण्यास उत्तेजन मिळण्याचें व त्यापायीं पैशाचें नाहक नुकसान होण्याचें चुकत असे. अशा प्रकारें त्यांच्या सल्लामसलतीच्या योगानें पुष्कळांचें हित होत असे. कांहीं खासगी तंटेबखेडे त्यांच्या-कडे उभय पक्षांनीं निकालासाठीं किंवा तडजोडीसाठीं आणले तर त्यांची शहानिशा ते इमानें इतबारें व केवळ निरपेक्ष बुद्धीनें करीत असत; आणि त्यांचा यथान्याय व पक्षपातविरहित निकाल पुष्कळांना पसंत वाटून त्यांचे तंटे मिटत. प्रकृत लेखकाला त्यांच्या ह्या लवादगिरीचा एक मासला एक वेळ पाहावयास मिळाला. पक्षकार ओतूर गांवचे होते. त्यांची भाऊबंदकी पुष्कळ दिवस चालली होती. त्यांनीं आपले कज्जे अनेक वेळां कोर्टांत नेले होते. परंतु त्यांचें समाधान झालें नव्हतें. माधवरावांनीं त्यांना आपआपल्या पक्षाच्या समर्थनाचे सगळे कागद आणावयास सांगितलें होतें. त्यांनीं ते त्यांच्याकडे आणून दिल्यास बरेच दिवस लोटले होते. तेवढ्या अवकाशांत त्यांनीं ते सगळे काळजीपूर्वक वाचून व एकाद्या मोठ्या न्यायाधिशाप्रमाणें मुद्दे काढून आपला निर्णय लिहून ठेविला होता. पक्षकारांना एकएक मुद्दा त्यांनीं नीट समजावून

सांगून तो ज्या कागदांच्या आधारावरून त्यांनीं काढला होता, ते त्यांना त्यांनीं भरभर वाचून दाखविले. ज्या गोष्टी परस्परविरोधी होत्या त्यांची त्यांस चांगली सुनावणी केली; आणि शेवटीं आपला निर्णय त्यांस वाचून दाखविला. मग प्रत्येक पक्षकाराला निरनिराळ्या मुद्दा-संबंधानें कांहीं तक्रार करावयाची असल्यास ती त्यांनीं करावयास सांगितली. त्याप्रमाणें त्यांनीं कित्येक बाबींसंबंधानें तक्रार केली. पण युक्तीच्या व कागदपत्रांच्या आधारानें ती त्यांनीं सारी मोडून काढली; आणि अखेरीस त्यांचा निकाल त्यांस मान्य करावा लागला. ही त्यांची लवादपद्धति व विलक्षण कुशाग्रबुद्धि पाहून प्रकृत लेखक अगदीं थक्क झाला. अशा प्रकारें त्यांनीं आपल्या हयातींत कितीतरी तंटे निवडून कोर्टांत जाऊन होणारा पुष्कळ द्रव्यनाश वांचविला.

ह्या शिवाय आणखी ते लोकांचे कितीतरी अर्ज व नोटिसा लिहून देत. कलेक्टर, मामलेदार वगैरे सरकारी अधिकाऱ्यांना मुद्देसूद अर्ज मराठींत लिहून देण्याच्या बाबतींत त्यांचा हातखंडा असल्याविषयीं त्यांची ख्याति झाल्यामुळें पुष्कळ लोक वकिलांकडे न जातां त्यांच्याकडे येत; आणि आपलीं असलीं कामें एक छदामाचा मोबदला न देतां त्यांच्यांकडून करून घेत. जे कित्येक धनिक असत ते त्यांच्या श्रमाचा मोबदला थोडाबहुत देत. असा कोणी पैसा दिला तर ते त्याचा स्वीकार करीत. परंतु मला इतके पैसे द्याल तर मी तुमचें काम करीन असें त्यांनीं कोणालाहि कधीं सांगितलें नाहीं. ह्या त्यांच्या निरपेक्षतेचा फायदा पुष्कळ मतलबी लोक बिनदिक्कत घेत. त्यांची स्थिति गरिबीची आहे, तर त्यांना थोडा मोबदला द्यावा अशी बुद्धि अंगीं सामर्थ्य असून त्यांना होत नसे. परंतु अशा लोकांसंबंधानें माधवराव कधींहि तक्रार करीत नसत. तर उलट असले लोक पुनः तसल्याच कामासाठीं आले तर तें करण्यास ते तयार असत. हा माधवरावांचा चांगुलपणा पाहून त्यांना लाज वाटत असे.

समाधीच्या जागीं शाळा आगल्यावर माधवराव देशस्थ मराठा-ज्ञातिधर्मसंस्थान नांवाच्या समाजाचे चिटणीस झाले. त्यांच्या हातीं ही संस्था आल्यावर तिला बराच व्यवस्थितपणा आला. ह्या समाजाच्या दौलतीचा तावा ज्यांच्या हातीं होता, त्यांच्यावर यांचा पक्का दाव बसून ती गिळंकृत करण्याचा एक दोन असामींचा डाव होता, तो त्यांनीं मुळीं चालूं दिला नाहीं. यामुळें त्या मतलबी मंडळीशीं त्यांचें वांकडें आलें. परंतु त्याची परवा न करितां माधवराव आपलें कर्तव्य प्रामाणिक-पणानें करीत असत. ह्या वांकड्यामुळें त्यांना बराच त्रास व छळ सोसावा लागला.

ह्या वेळीं देशस्थ मराठे मंडळीची एक ज्ञातिपंचसभा असे, तिचेंहि चिटणीस माधवरावांस नेमिलें. ह्या सभेंत ज्ञातिसंबंधी अनेक प्रकारच्या भानगडी निवाड्यासाठीं येत. सगळ्या पंचमंडळींत माधवराव तेवढे सुशिक्षित, सुविचारी व निरपेक्ष असल्याकारणानें तिच्यापुढें येणाऱ्या भानगडींचा योग्य निकाल देण्याच्या कामीं माधवरावांचा अतिशयित उपयोग होत असे. कोणत्याहि पक्षाचा अभिमान न धरितां केवळ निःपक्षपात बुद्धीनें व सत्यास स्मरून वखेड्यांचा निवाडा करण्याचा त्यांचा नेम असल्यामुळें मतलबी व लबाड लोक त्यांचा द्वेष करीत असत. परंतु माधवराव पक्के निरपेक्ष व स्वार्थरहित अस-ल्यामुळें त्यांच्या द्वेपास ते मुळीं भीक घालीत नसत. कित्येक बखेडे ज्ञातिपंचांपुढें न येतां परस्पर म्याजिस्ट्रेटांकडे जात. अशांपैकीं कांहीं बखेडे म्याजिस्ट्रेट ज्ञातिपंचांकडे निकालासाठीं पाठवीत. ते असे त्यांच्या-कडे आले म्हणजे त्यांचा निकाल करण्याचें काम ते आमच्या माधव-रावांकडे सोंपवीत; आणि मग ते केवळ निःपक्षपात न्यायाधिशाच्या पद्धतीप्रमाणें त्या बखेड्यांचा निवाडा करीत. ह्या त्यांच्या कित्येक निवा-ड्यांची प्रेसिडेन्सि म्याजिस्ट्रेटहि तारीफ करीत.

माधवरावांची त्या वेळची एक मोठी कामगिरी ही होती कीं ते गरीब व मागासलेल्या लोकांच्या तर्फे वर्तमानपत्रांस वारंवार लेख लिहीत. रावबहादूर लोखंडे यांनीं दीनबंधु पत्र हातीं घेतल्यापासून त्यांत ते वारंवार लेख लिहीत असत. ते त्यांचे लेख भारदस्त असून माहितीनें भरलेले असत. त्यामुळें जो विषय ते लिहावयास घेत त्यासंबंधाची माहिती लोकांना चांगली होऊन त्यांचीं मतें सुधरत असत. उगीच शिव्याशाप देऊन किंवा उपहास करून कोणाची फजिती करण्यास ते कदापि प्रवृत्त होत नसत. प्रतिपक्षाला जबाब द्यावयाचा तो भारदस्तपणाचा असून शिष्टाचारपद्धतीस अनुसरून असावा अशी ते चांगली खबरदारी घेत. यामुळें त्यांच्या लेखांचा चांगला उपयोग होत असे. पुढें शेतकऱ्यांचा कैवारी नांवाचें पत्र रामजी संतुजी आवटे वगैरे मंडळीनें काढलें. त्यांत ते शेतकऱ्यांच्या स्थितीविषयीं लेख लिहूं लागले. ह्या विषयावरील त्यांचा एक लेख वाचून प्रकृत लेखकास मोठें कौतुक वाटलें व शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास झटणें हें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचें कर्तव्य आहे असें त्यास वाटूं लागलें; आणि त्याच्या हातून त्या काळीं जी कांहीं चळवळ झाली व जे लेख त्यानें सुबोधपत्रिकेंत व सुबोधप्रकाशांत लिहिले, त्यांची स्फूर्ति त्याला माधवरावांचा सदरहू लेख वाचल्यानें झाली. माधवरावांचे लेख इतरहि कित्येक पत्रांतून प्रसिद्ध होत असत. ज्ञानप्रकाश व प्रभाकर ह्या पत्रांतले त्यांचे कित्येक लेख प्रकृत लेखकानें वाचले होते. त्यांच्या लेखांची भाषा मोठी चटकदार व विवेचनशैली वाचणाराच्या मनाची खात्री करून देणारी अशी असे. त्यांचें लेखनसामर्थ्य चांगल्या प्रतीचें असल्यामुळें त्यांना बडोद्यास निघावयाच्या बडोदावत्सल नांवाच्या पत्राचे संपादक करण्याचें त्यांच्या मित्रांनीं ठरविलें होतें. तो प्रकार असा:—श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड यांनीं दिवाणबहादूर रामचंद्र विठोबा धामनसकर, जे त्या वेळीं बडोद्यास सुभे ( कलेक्टर ) होते, त्यांना असें सांगितलें कीं शेत-

कऱ्यांच्या कैवाऱ्यासारखें एक मराठी वर्तमानपत्र आपल्या राजधानींत काढण्याची व्यवस्था करावी. त्याप्रमाणें दि. व. धामणसकरांनीं रा. रामजी संतुजी आवटे यांना प्रसिद्ध कॉन्ट्राक्टर शेट रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांच्या वरीं बोलाविलें, आणि महाराजांचा विचार त्यांस समजून सांगितला. प्रकृत लेखक त्या वेळीं तेथें होता. आवट्यांनीं सांगितलें कीं महाराज मला दरमहा तीनशें रुपये देतील व वर्तमानपत्राला अन्य रीतीनें मदत करितील तर आपण बडोद्यास छापखाना घालून पत्र काढण्याचें धाडस करूं. ह्या त्यांच्या अटी दि. व. धामणसकर यांनीं मान्य केल्यावर आम्हीं असें ठरविलें कीं मुख्यतः ज्यांच्या लेखांमुळें गायकवाड महाराजांना शेतकऱ्यांचा कैवारी एवढा आवडला त्यांना म्हणजे अर्थात् माधवरावांना त्या पत्राचे संपादक म्हणून आवट्यांनीं घेऊन जावें व त्यांना प्रथम दरमहा साठ रुपये द्यावे. ही गोष्ट आवट्यांनीं दि. व. धामणसकरांकडे कबूल केली. परंतु त्यांनीं बडोद्यास गेल्यावर त्याप्रमाणें वर्तन केलें नाहीं. त्यांनीं बडोदावत्सल पत्राचें संपादकत्व दुसऱ्याच एका माणसाला सांगितलें. हा त्यांचा वचनभंग शाळेच्या दृष्टीनें पाहतां हिताचा ठरला.

मागें सांगितलें आहे कीं भिवंडीस असतां त्यांना सभांस जाऊन लोक काय बोलतात व कसें बोलतात तें ऐकण्याचा नाद असे; व प्रसंगीं एकाद्या उपयुक्त विषयावर आपला अभिप्राय ते देत असत. मुंबईस आल्यावर हा त्यांचा नाद कमी न होतां उलट अधिकच वाढला; आणि त्या काळीं मुंबई शहरांत चोहोंकडे निरनिराळ्या संस्था निर्माण होऊन नानाप्रकारच्या विषयांवर नेहमीं भाषणें व चर्चा चालत. आर्यसमाज, प्रार्थनासमाज आदिकरून मंडळ्यांच्या नियमानें चांगल्या विद्वान् गृहस्थांचीं भाषणें वारंवार होत. त्यांची माहिती आमच्या माधवरावांना लागली म्हणजे ते त्या व्याख्यानांच्या ठिकाणीं ऐकल्यांत असून येत. त्यांचे दोनतीन अमळ जागते शिष्य असत ते त्यांना

गाडींत बसवून सभेच्या ठिकाणीं नेत असत. त्यांना पाहताच लोक त्यांच्या साठीं चांगली सोईची जागा करून देत. त्यांना टेकून वसण्यासाठीं त्यांच्या गिरद्या व तक्ये हीं बरोबर असत. नीतिप्रसारक मंडळी नांवाची एक संस्था त्यांचे भिवंडीपासूनचे मित्र सिमिअन बेन-जामिन नांवाचे एक इस्राएल गृहस्थ होते त्यांनीं पायधुनीवर सन १८८२ त स्थापली होती. त्या मंडळींचीं व्याख्यानें प्रतिरविवारीं होत; आणि त्यांत नाना प्रकारच्या उपयुक्त विषयांवर चर्चा होत असे. प्रकृत लेखक ह्या संस्थेचा आरंभापासून सभासद होता. ह्या संस्थेच्या विद्यमानें एकाद्या महत्त्वाच्या विषयावर कोणी तरी मोठा विद्वान् गृहस्थ बोलणार आहे असें आमच्या माधवरावांना कळलें तर ते सभेला अवश्य येत, व प्रसंगीं त्या विषयावरील आपला अभिप्राय बोलून दाखवीत. ह्या संस्थेंत एके समयीं जातिभेद या विषयावर कित्येक आठवडे चर्चा चालली होती. त्या वेळचे कित्येक विद्वान् गृहस्थ येऊन ही चर्चा करीत असत. आमचे माधवरावहि ही चर्चा ऐकावयास अनेक वेळां आले; आणि आमच्या आग्रहास्तव त्यांनीं एका खेपेस त्या विषया-वर व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं निरनिराळ्या पक्षांच्या कोटिक्रमाची यथार्थता कितपत आहे याची शहानिशा एकाद्या न्यायाधिशाप्रमाणें इतकी सुंदर केली कीं ती ऐकून श्रोतृवृंद थक्क झाला.

ह्याच सुमारास हिंदुयुनिअन क्लब नांवाची एक संस्था न्यायमूर्ति तेलंग, बापट वगैरे विद्वान गृहस्थांनीं निर्माण केली. तींत हायकोर्टांत काम करणारे बरेच हिंदू वकील असत, व इतरहि कांहीं विद्वान् लोक तींत असत. ह्या संस्थेच्या विद्यमानें पुण्याच्या वसंतव्याख्यान-मालेप्रमाणें हेमंतव्याख्यानमाला प्रतिवर्षीं होई. तींत मोठमोठे विद्वान् गृहस्थ महत्त्वाच्या विषयांवर व्याख्यानें देत. हीं व्याख्यानें ते बहुशः लिहून आणीत; आणि येथील निर्णयसागर छापखान्याचे प्रख्यात मालक

शेट जावजी दादाजी जे. पी. तीं छापून प्रसिद्ध करीत. ह्या व्याख्यान-मालेस आमचे माधवराव बहुशः हजर असत; आणि दोनतीन वेळां त्यांनीं व्याख्यानांच्या विषयांवर चर्चा चालली असतां आपले अभिप्राय इतक्या उत्कृष्ट रीतीनें बोलून दाखविले कीं तेथें शेंकडो लोक जमत त्यांची अशी खात्री झाली कीं हे मोठे विद्वान् वक्ते आहेत. पांढरपेशां-च्या व विद्वन्मंडळाच्या सभेंत आपल्या वृक्तृत्वाच्या योगानें छाप बसविणारा हा मराठा गृहस्थ पाहून प्रकृत लेखकाला मोठा अचंबा व अभिमान वाटला, व आपणहि अशा प्रकारचा वक्ता होऊन अशा लोक-समूहापढें बोलण्यास कधीं समर्थ होऊं असें त्यास होऊन गेलें, व तो त्या दिशेनें मोठ्या नेटानें उद्योग करूं लागला.

त्या काळीं गिरण्यांतील काम करणाऱ्या लोकांची स्थिति अतिशयित शोचनीय होती. रावबहादूर लोखंडे व इतर कित्येक लोक त्यांची स्थिति सुधारण्याच्या खटपटींत होते. फ्याक्टरि कमिशन सरकारानें नेमून मजुरांच्या स्थितीची चौकशी चालविली होती. अशा प्रसंगीं लोकमत जागृत करण्यासाठीं व गिरणीकामदारांची वास्तविक स्थिति सरका-राच्या नजरेस आणून देण्यासाठीं रा. ब. लोखंड्यांच्या खटपटीनें जागोजाग सभा होत असत. प्रकृत लेखक ह्या सभांना नेहमीं जाऊन संधि मिळाल्यास बोलतहि असे. अशी एक सभा भायखळ्यावरील पंचखात्याच्या उघड्या जागेंत भरली होती. आमच्या माधव-रावांनीं ह्या सभेंत पहिलें भाषण केलें. सभेला दोनहजारांहून अधिक लोक जमले होते. माधवरावांचे त्या वेळचें भाषण अप्रतिम झालें. त्यांच्या ठायींच्या खऱ्या वक्तृत्वाचें उत्तम प्रदर्शन त्या वेळीं झालें. त्यांची वाणी मधुर असून वर्णनशैली एकाद्या मोठ्या कवीसारखी होती. ते प्रत्येक शब्द स्पष्ट व सावकाश बोलत, आणि तो प्रत्येक माणसाच्या कानांत दुमदुमून जाई अशा स्वरानें उच्चारीत. त्यांच्या भाषणानें पुष्कळ सहृदय श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहत होत्या. प्रकृत लेखकाची

अशीच अवस्था झाली; आणि असें वक्तृत्व आपणांस कधीं तरी करितां येईल काय असें त्यास वाटूं लागलें. वक्त्याला जें एक प्रकारचें नाट्य पाहिजे तें आमच्या माधवरावांच्या अंगीं परिपूर्ण भरलें होतें. सामान्य संभाषणांतहि त्यांचा लाघवीपणा मोठा मोहक असे.

मराठी भाषा त्यांना चागली येत असे, म्हणून त्यांना कोणत्याहि विषयावर बोलावयास मुळीं अडचण पडत नसे. मराठी भाषेप्रमाणेंच उर्दू भाषाहि त्यांना चांगली येत असून तींत त्यांना उत्तम बोलतां येत असे. मुंबई शहरांत स. १८९३ सालीं हिंदुमुसलमानांचा मोठा दंगा झाल्यावर त्यांच्यामध्यें पुनरपि ऐक्यभाव वृद्धिंगत करण्यासाठीं ठिकठिकाणीं सभा झाल्या. अशी एक सभा मदनपुऱ्यांत मुसलमानाच्या भर वसतींत झाली. तींत माधवरावानीं उर्दू भाषेंत भाषण केलें. तें ऐकण्याची संधि प्रकृत लेखकाला मिळाली. त्यांनीं अस्सल उर्दूत असें अस्खलित भाषण केलें कीं तें ऐकून लोकांनीं तोंडांत बोटें घातलीं. असें उत्तम भाषण त्या सभेंत दुसऱ्या कोणाहि मुसलमान गृहस्थाला करितां आलें नाहीं.

माधवरावाच्या संबंधाच्या आणखी एका आठवणीविषयीं लिहून हें प्रकरण पुरें करितों. सत्यशोधक समाजाचे मूळप्रवर्तक जोतीराव फुले हे पुण्याहून येथें आले; तेव्हां त्यांचें एक व्याख्यान समाधीच्या जागीं झालें. रावबहादूर लोखंडे अध्यक्ष होते. प्रकृत लेखक त्यांचें व्याख्यान ऐकावयास गेला होता. रा. फुल्यांनीं आपलें ह्मणणें थोडक्यांत पण मुद्देसूद रीतीनें लोकांपुढें मांडलें, आणि कोणाच्या कांहीं शंका असल्यास त्या त्यांनीं विचाराव्या असें ते म्हणाले. तेव्हां आमच्या माधवरावांनीं त्यांच्या सर्वसाधारण सिद्धांतांसंबंधानें आपली अनुकू- प्रकट केली; पण ब्राह्मण उपाध्यायांच्या ऐवजीं आपले उपाध्याय झाले पाहिजेत असें जें रा. जोतीरावांनीं प्रतिपादन केलें तें माधवरावांना

रुचलें नाहीं. कारण परिणामीं ही एक उपाध्यायांची नवीन जात निर्माण केल्यासारखें होणार आहे; आणि हल्लींच्या ब्राह्मण उपाध्यायांप्रमाणें तेहि शिरजोर होऊन बसतील अशी भीति आहे, असें ते म्हणाले. याशिवाय आणखी सत्यशोधनाचे दुसरे कोणकोणते प्रकार उपस्थित करावयाचे आहेत तें लोकांना स्पष्टपणें कळणें उचित आहे. ते कळून लोकांच्या पसंतीस उतरणार नाहींत तोंपर्यंत सत्यशोधक समाजाचा प्रसार होणें शक्य नाहीं; आणि ब्राह्मण उपाध्याय नको ह्मणण्याचा उपक्रम केल्यानें परिणामीं सगळ्या ब्राह्मण जातीशीं नाहक द्वेष माजविल्याचें अपयश माथीं येणार आहे; असा माधवरावांनीं आपला स्पष्ट अभिप्राय सांगितला. तो प्रकृत लेखकाला सर्वस्वीं पटला; आणि आज मितीला हें त्याचें मत कायम आहे. माधवरावांनीं चाळीस बेचाळीस वर्षांपूर्वीं केलेलें भाकीत आज बरेंच खरें ठरल्यासारखें आहे. माधवरावांची ही दीर्घदृष्टि सत्यशोधक समाजाचा पुरस्कार करणाऱ्यांच्या ठायीं असती तर ह्या चळवळीला आज निराळेंच वळण लागलें असतें; आणि प्रतिपक्षाला ती पुष्कळ प्रकारें भारी झाली असती. हल्लीं तिला हास्यरसप्रधान व निंदाप्रचुर तमाशाहून विशेष चांगलें स्वरूप प्राप्त झाल्याचें दिसत नाहीं.

---

## शेवटचे दिवस.

येथवर निरूपण केल्याप्रमाणें आमच्या माधवरावांची ख्याति चोहोंकडे पसरली. लोकांच्या वास्तविक हितासाठीं झटण्याचा त्याचा कृतसंकल्प शेवटपर्यंत कायम राहिला. त्यांना अगदीं गरिबींत काळ कंठावा लागत असे, तरी कोणाही श्रीमंत मनुष्याकडे द्रव्यादिकां-



कै. धर्माजीराव माधवराव रोकडे.

Lakshmi Art, Bombay, 8.

च्या मदतीसाठीं हात पसरणें त्यांच्या जिवावर येई. कारण ते पुरे स्वाभिमानी होते; आणि लोकांकडून द्रव्यसाहाय्य घेऊन त्यांचे मिंधे होण्यापेक्षां मरण पुरवलें असें त्यांस वाटे. मागें सांगितलेंच आहे कीं त्यांची वायको व मुली भाजीपाला विकून जें कांहीं मिळवीत तेवढ्यावर त्यांचा कसावसा निर्वाह चाले; आणि शाळेचें फीच्या रूपानें जें कांहीं उत्पन्न होई तें मदतगार शिक्षकांना खर्चीं पडत असे. पुढें असें झालें कीं दोन मुलींचीं लग्नें होऊन त्या आपआपल्या घरीं गेल्या. त्यामुळें भाजीच्या व्यापाराचें उत्पन्न बरेंच कमी झालें; आणि शिक्षकांना पुरेसें वेतन देतां येणें दुरापास्त झालें. असा पेंच आल्यामुळें माधवरावांचा धर्माजीराव नांवाचा एक मुलगा इंग्रजी पांचवी कीं सहावी इयत्ता एल्फिन्स्टन हायस्कुलांत शिकत होता, त्याचें पुढलें शिकणें बंद करून त्याला आपल्या शाळेंत शिकविण्याच्या कामास त्यांनीं लाविलें. ह्याप्रमाणें शाळेंत काम करावयाला स्वतांचा मुलगा मिळाल्यामुळें एका शिक्षकाचा खर्च कमी झाला आणि त्यांची तेवढी ददात मिटली.

ह्या सुमारास रावबहादूर लोखंडे यांनीं गिरण्यांतील लोकांसाठीं बरीच खटपट केल्यामुळें त्यांचा लौकिक झाला होता. शिवाय त्यांनीं दीनबंधु पत्र चालविलें होतें, त्यांत गरीब लोकांच्या कैवाराचे चांगले लेख प्रसिद्ध होत असत. त्यांतले कांहीं आमचे माधवराव लिहीत असत. मजूर लोक व मागसलेले वर्ग यांच्या पक्षाचें असें हें एकच पत्र त्या वेळीं असे. पुढें फ्याक्टरि कमिशन बसलें. त्यांत रा. ब. लोखंडे यांस एक कमिशनर नेमिलें. त्यासंबंधाची त्यांची कामगिरी चांगली झाल्याबद्दल सरकारानें त्यांना रावबहादूर ही पदवी दिली. सामान्य लोकांत व सरकारांतहि त्यांचें वजन बरेंच वाढलें. परंतु ते दीनबंधु पत्र चालवीत असत, त्यापासून मुळींच पैदास होत नसल्यामुळें त्यांना कर्ज होई, व त्यांचा स्वतांचाहि निर्वाह चालण्यास

कांहींएक मार्ग नसे. ह्यामुळें त्यांना त्या वेळीं नांवारूपास आलेल्या मराठे वगैरे जातींतील कांहीं कॉन्ट्राक्टर व व्यापारी गृहस्थांकडे दीनबंधूच्या नांवानें जेव्हां तेव्हां मदत मागावी लागत असे. आमच्या माधवरावांचा जसा कृतसंकल्प होता कीं कितीहि हाल सोसावे लागले तरी शाळा चालू ठेवावयाची, तसाच रा. ब. लोखंडे यांचा दीनबंधु पत्र चालू ठेवण्यासंबंधाचा निर्धार असे. भेद एवढाच कीं लोखंडे आपल्या मित्रांकडून जेव्हां तेव्हां मदत मिळवीत; परंतु आमचे माधवराव पुरे स्वाभिमानी असल्यामुळें आपल्या शाळेच्या नांवानें लोकांकडे याचना करण्यास ते कधींहि तयार नसत. कोणी आपण होऊन शाळेला कांहीं मदत केली तर तिचा ते साभार स्वीकार करीत.

अशी स्थिति असतांहि रावबहादूर लोखंडे हे मोठ्या योग्यतेस चढले. तेव्हां त्यांना ज्यांच्याकडून वारंवार मदत होई त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याचा एक मार्ग त्यांनीं असा काढला कीं आपल्या उपकारकर्त्यांस सरकाराकडून बहुमानाच्या पदव्या देववाव्या. ह्याप्रमाणें त्यांनीं आमचे माधवराव, निर्णयसागर छापखान्याचे संस्थापक शेठ जावजी दादाजी, प्रसिद्ध कॅान्ट्राक्टर रावबहादूर धोंडिबा हणमंतराव बडदे, शेट यमाजी बाळाजी रुकारे, रावबहादूर विठ्ठलराव कृष्णाजी वंडेकर इत्यादिकांना जास्टिस ऑफ दि पीस हीं पदवी सरकाराकडून स. १८९२ सालीं देवविली. ही पदवी देतांना ज्याची शिफारस होते त्याच्या लायकीची बारीक चौकशी सरकारांतून होत असते. लोकांमध्यें त्यांची मान्यता आहे किंवा कसें, व त्यांच्याकडून लोकांचें कांहींतरी उपयुक्त काम झालें आहे व पुढें आणखी होण्यासारखें आहे किंवा कसें, याचाच मुख्यत: तपास होत असतो. आमचे माधवराव ह्या कसोटीस उतरण्याची मुळींच पंचाईत नव्हती. ही पदवी त्यांना मिळाल्याबद्दल त्यांचें जिकडून तिकडून अभिनंदन झालें. त्यांतून विशेष सांगण्यासारखें अभिनंदन ह्मटलें ह्मणजे पुण्याच्या मराठे वगैरे मंडळीकडून झालें तें होय. त्या लोकांनीं मोठी

जाहीर सभा भरवून तिचे अध्यक्ष रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख यांस केलें, व उपाध्यक्ष रावबहादूर विष्णु मोरेश्वर भिडे यांस केलें. ह्या दोघां अध्यक्षांनीं माधवरावांच्या खऱ्या योग्यतेची माहिती पुण्याच्या लोकांना चांगल्या रीतीनें करून दिली. ह्या समारंभानंतर तेथल्या लोकांनीं माधवरावांचें एक व्याख्यान रा. ब. देशमुखांच्या अध्यक्षतेखालीं करविलें. व्याख्यानाचा विषय ' मनुष्याचें कल्याण ' हा होता. एक पांगळा विद्वान् मराठा वक्ता बोलणार म्हणून व्याख्यानाला लोकांची मोठी गर्दी झाली. त्यांचें व्याख्यान नेहमींप्रमाणें मोठें चटकदार पण बोधपर झालें. रा. ब. देशमुख आमच्या माधवरावांना भिवंडीपासून ओळखीत असून मुंबईंत ते असले म्हणजे त्यांना भेटावयास येऊन त्यांच्याशीं तासांचे तास नाना विषयांवर बोलत बसत. अशीच गोष्ट राजाराम शास्त्री भागवत यांची असे. मराठ्यांविषयीं चार उद्गार ह्या नांवाचें एक मोठें पुस्तक शास्त्रीबावा लिहीत असतां आपल्या माहितीचा पडताळा पाहण्यासाठीं व अवांतर माहिती मिळविण्यासाठीं ते माधवरावांकडे वारंवार येत असत. ही अशी मान्यता मराठे वगैरे मागसलेल्या वर्गांतल्या कोणाहि गृहस्थाची आजपर्यंत झाल्याचें प्रकृत लेखकाला आठवत नाहीं. द्रव्यबलावर किंवा एकाद्या कारखान्याच्या निमित्तानें कित्येक गृहस्थांची बोलबाला झाल्याचें त्यानें पाहिलें आहे. परंतु पदरीं दारिद्र्य असतां केवळ विद्वत्तेच्या, सत्कृतिपरायणतेच्या व निःसीम आत्मयज्ञाच्या बलावर लोकांस आपल्या भजनीं लावण्याचें यश एका लंगड्या पंतोजीलाच साधलें होतें. त्यांनीं लहान वयांत मिशनरींच्या शाळेंत थोडे दिवस राहून तेथें जो निरपेक्षबुद्धीनें लोकसेवा करण्याचा उज्ज्वल प्रकार पाहिला तो त्यांनीं आपल्या आचरणांत आमरण आणून स्वजीवितसाफल्य उत्तम प्रकारें केलें. हे आमचे माधवराव एकाद्या ब्राह्मण कुळांत जन्मास आले असते तर त्यांची वाहवा सर्वतोमुख झाली असती. वर्तमानपत्रांतून त्यांची स्तुति वारंवार झाली असती.

आणि त्या द्वारें त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली असती. आमच्या मागसलेल्या मराठे वगैरे लोकांना असल्या दिव्यरत्नाची पारख करितां आली नाहीं, व ज्या कित्येकांना ती थोडीबहुत करितां आली ते एक तर मत्सरग्रस्त होते किंवा प्रसिद्धिसाधनहीन होते, म्हणून त्यांच्याकडून त्यांच्या कीर्तीच्या प्रसारार्थ कांहींएक झालें नाहीं. पांढरपेशांनीं असल्या महापुरुषाचें मोठें स्मारक करून त्याची स्मृति कायम राखिली असती.

असो, आतां त्यांच्या संबंधानें आणखी कांहीं सांगण्यासारखी माहिती प्रकृत लेखकाला उपलब्ध न झाल्यामुळें त्यांचा हा चरित्रलेख येथें पुरा करणें भाग आहे. सन १८९६ सालच्या अखेरीस मुंबई शहरांत प्लेगनें मनस्वी कहर केल्यामुळें येथले लाखो लोक आपआपल्या गांवीं पळून गेले. कारखाने, गिरण्या वगैरे बहुतेक बंद पडल्या; त्याप्रमाणेंच शाळाहि बंद कराव्या लागल्या. इतरांप्रमाणें माधवरावांनाहि शाळा बंद करून स्वग्रामीं जावें लागलें. तिकडे असतां एके दिवशीं ते आपल्या गांवाहून जुन्नरास जाण्यासाठीं बैलाच्या गाडींत बसून चालले असतां वाटेंत बैल बुजून गाडी उलथली, आणि ते खालीं पडून त्यांचें प्राणोत्क्रमण तत्काळ झालें ! मरणकाळीं त्यांचें वय ५७ वर्षांचें होतें. ते पायांनीं अधू होते तरी त्यांची प्रकृति नेहमीं निकोप असे. दुखणेंखुपणें असें त्यांना कधीं फारसें नसे. त्यांच्या मुखावर नेहमीं तेज असे, व ते सर्वदा हसतमुख असत. एकाद्या मोठ्या विरक्त साधूसारखी त्यांची वृत्ति असे. प्रापंचिक असुख कितीहि भारी असलें तरी त्याचा परिणाम त्यांच्या शांत चित्तवृत्तीवर मुळीं होत नसल्यामुळें त्यांची मुखश्री कधींहि उदास दिसत नसे; आणि ते लोकांशीं मोठ्या प्रेमळपणानें व उल्लासवृत्तीनें बोलत चालत असत. त्यावरून ह्या पंतोजीला आपल्या बिकट स्थितीची मुळीं परवा नाहीं असें वाटत असे. सारांश, असले महात्मे आमच्या लोकांमध्यें जितके निर्माण होतील तितके थोडेच आहेत. निवृत्तिमार्गाकडे

प्रवृत्त करून देवाच्या भजनपूजनांत काळ घालवून आयुष्य कंठावयास लावणारे साधुसंत प्रकृत लेखकाच्या मतें हल्लींच्या विकट स्थितींत कुच-कामाचे होत. कारण मनुष्य कितीहि निवृत्तिपर झाला व प्रपंच सोडून परमार्थाकडे एकसारखा लागला तरी त्याला माध्यान्हाची तरतूद अवश्य करावी लागते. त्यानें स्वतांच्या श्रमानें ती केली नाहीं तर दुसऱ्यांच्या श्रमानें पैदा झालेल्या अन्नादिकांवर त्याला निर्वाह करावा लागतो. असें हें परावलंबन खऱ्या माणसाला शोभत नाहीं, व खऱ्या परमार्थ-प्राप्तीलाहि तें सर्वस्वीं विघातक होतें. म्हणूनच साधुवर्य तुकोबांचा असा बोध आहे कीं "सुखें संसार करावा, माजी विठ्ठल आठवावा." तेव्हां तात्पर्य काय कीं गरीबगुरिबांना आपली उपजीविका करण्याचें सांप्रत-काळीं फार कठीण झालें आहे. ब्रिटिशसरकाराच्या अमलांत सर्वत्र शांतता प्रस्थापित होऊन दंगेधोपे व लढाया यांच्या पायीं होणारा मनुष्य-संहार पुष्कळ टळला असून रोगराईवर अधिकाधिक गुणकारी उपाय आधुनिक शास्त्रीय शोधांमुळें अनुकूळ झाले आहेत; आणि दुष्काळांच्या योगानें पूर्वीसारखा मनुष्यनाश होण्याची भीति आगगाड्यांच्या व आगबोटींच्या योगानें फारशी उरली नाहीं. ह्या सगळ्या गोष्टींमुळें आमच्या देशांत लोकसंख्या भराभर वाढत चालली आहे. अशा स्थितींत आणखी परस्थांशीं वाढत चाललेल्या व्यापारामुळें महर्घता विलक्षण वाढली आहे; आणि सरकाराचा खर्च अतिशयित वाढल्यामुळें करांचाहि बोजा वाढत्या प्रमाणावर आहे. या सगळ्या गोष्टींमुळें जीवनकलह अति-भयंकर स्वरूप पावला आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरांत तर गरीब-गुरिबांस फारच विपन्नावस्था प्राप्त झाली आहे. यास्तव त्यांच्या अंगीं निर्वाहाचे धंदे चालविण्याचें विशेप सामर्थ्य व कौशल्य येण्यासाठीं त्यांस शिक्षण मिळणें सांप्रत काळीं अत्यंत इष्ट झालें आहे. म्हणून बहु-तेक पाश्चिमात्य राष्ट्रांत प्राथमिक शिक्षण फुकट व सक्तीचें करण्यांत आलें आहे. ग्रेटब्रिटनांत तर तें पन्नास वर्षांपूर्वीं सुरू झालें

आहे. आमचा देश ह्या बाबतींत अगदीं मागें आहे. आमचें सरकार ह्या बाबतींत अंमळ बेपरवाच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याला पैशाची अडचण कायमची आहे. अशा स्थितींत गोरगरिबांस साक्षर करण्याच्या कामीं जे साहाय्य करितात ते खरे परोपकारकर्ते होत. आमच्या माधवरावांनीं आपल्या अंगच्या सामर्थ्यानुसार सतत तीस वर्षें खपून आपल्या अज्ञान व गरीब बांधवांस साक्षर करण्याचें सत्कर्म केलें; आणि शेंकडो अज्ञान कुटुंबांचें कायमचें कल्याण केलें. त्यांच्या आत्मयज्ञपूर्वक केलेल्या श्रमाच्या योगानें ज्ञानप्राप्तीचीं साधनें अनुकूल होऊन पुष्कळांना स्वकर्तव्याची ओळख झाली, व त्यांचा ऐहिक प्रपंच नेटका चालून व परलोकप्राप्तिहि त्यांस ज्ञानबलेंकरून सुगम झाली. यास्तव आमच्या माधवरावांची गणना उत्तम साधूंमध्यें केली असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांच्या आकस्मिक व अकालिक निधनाची वार्ता ज्या ज्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली, त्या सर्वांनीं त्यांच्या वास्तविक योग्यतेचें निरूपण करून खऱ्या जनहितकर्त्या पुरुषांत त्यांची गणना केल्याचें प्रकृत लेखकास आठवतें; आणि त्यांच्या संबंधानें पुढील साधूक्ति यथार्थ ठरते.

**उपजणें मरणें न चुके नरा । फिरत नित्य असे भवभोंवरा ॥**
**उपजला तरी तोचि मला गमे । कुल समुन्नति ज्यास्तव घे रमे ॥**

---

## त्यांच्या पश्चात् शाळेची व्यवस्था.

माधवरावांच्या मागें त्यांची शाळा चालू राहते किंवा कसें इकडे लोकांचे डोळे लागून राहिले. शाळा चालू ठेवण्याचा सगळा बोजा आतां माधवरावांचे ज्येष्ठ पुत्र धर्माजीराव यांच्या शिरीं आला. मागें सांगितलें आहेच कीं ते शाळा सोडून वडिलांना मदत करा-



कै. श्री. सौ. अहल्याबाई.

Lakshmi Art, Bombay, 8.

वयास लागले होते. ह्या मुलाखेरीज आणखी त्यांना एक मुलगा होता, तो एकवीस वर्षांचा असतां दारूच्या स्फोटांत भाजून वारला. त्याचें लग्न निघालें असून लग्नमुहूर्ताच्या आधीं दोन दिवस दारूकाम एकवट करीत असतां त्याचा अकस्मात् स्फोट होऊन त्यांत तो भाजला. अशा स्थितींतच त्याचें लग्न लावून घेतलें आणि दुसऱ्यां दिवशीं त्याचें देहावसान झालें. हा अत्यंत खेदजनक प्रकार स. १८९६ तील फेब्रुवारी महिन्यांत घडला; आणि माधवरावजींचें देहावसान त्याच वर्षाच्या दिसेंबर महिन्यांत झालें. ह्याप्रमाणें एक वर्षाच्या अवधींत आपल्या घराण्याचे दोन मोठे आधारस्तंभ गत झाल्यामुळें धर्माजीरावांना अत्यंत दुःख होऊन त्यांच्या ठायीं औदासीन्य येणें साहजिक होतें; परंतु आपल्या वडिलांनीं लावलेला हा ज्ञानदीपक विझूं देणें बरोबर नाहीं असें त्यांना वाटून त्यांनीं तो कुडींत प्राण आहे तोंपर्यंत पेटता ठेवण्याचा निर्धार केला. हा त्यांचा सत्संकल्प वडिलांच्या पश्चात् सत्तावीस वर्षे कायम राहिला.

धर्माजीरावांच्या एकंदर चार बहिणी, त्यांपैकीं तिघींचा वडिलांच्या ह्यातींत विवाह झाला होता. त्यांतली तिसरी अहल्याबाई. हिच्या नवऱ्यानें दुसरी बायको केली होती, आणि त्याचा धर्मस्थानाच्या प्रकरणांत माधवरावांशीं व पुढें धर्माजीरावांशीं बेबनाव होऊन अहल्याबाईचा मनस्वी छळ होऊं लागला व तिला क्षयरोग लागला. तेव्हां अर्थात् धर्माजीरावांनीं तिला आपल्या घरीं आणून औषधोपचार करून बरी केली, आणि तिला पुनः सासरीं पाठविण्यांत धोका असल्यामुळें आपल्या घरींच ठेवून घेतलें. ही बरी झाल्यावर शाळेंत शिकवूं लागली. त्यामुळें एका शिक्षकाचा खर्च कमी झाला. त्यांची सगळ्यांत लहान बहीण श्रीमती जनाबाई. ही आठ वर्षांची असतां माधवराव निधन पावले. तिला धर्माजीरावांनीं एका चांगल्या श्रीमंत घराण्यांत दिलें होतें. परंतु तिच्या दुर्दैवानें तिचा नवरा आपल्या बापाच्या

पश्चात् अतिशयित बदफैल व दारूबाज झाला आणि आपली वडिलोपार्जित दौलत लौकरच उधळून कफल्लक झाला. तेव्हां धर्माजीरावांनीं जनाबाईला माहेरीं आणून ठेविलें. पुढें त्यांनीं असा विचार केला कीं तिचा नवरा अगदींच गरिबीस आला तर तिला आपलें स्वतांचें व आपल्या नवऱ्याचेंहि उपजीवन करण्याचें सामर्थ्य यावें ह्मणून तिला कामा हास्पिटलमध्यें रुग्णशुश्रूषा व सूतिकाकृति शिकावयास ठेविलें. तेथें ठेवण्यासाठीं रकम भरावी लागत असे; ती त्यांना प्रो॰ वेलणकर यांनीं शेट दामोदरदास सुखडवाला यांजकडून कर्जी देवविली. जनाबाई ह्या कामांत चांगली तरबेज होऊन डिप्लोमा घेऊन आली आणि सुइणीचें काम करूं लागली. ह्या बाईची वृत्ति आपल्या वडील भावंडांसारखीच असल्या कारणानें आपल्या वडिलांची शाळा कायम राखण्याच्या कामीं तिलाहि अभिमान वाटला. आणि आपलें सगळें उत्पन्न ती आपल्या भावाच्या हातीं शाळेच्या खर्चासाठीं देऊं लागली. तिचा नवरा पुरा व्यसनाधीन होऊन रोगग्रस्त झाला. तेव्हां ती त्याच्या समाचाराला वेळोवेळां जाई. पुढें तो लौकरच निवर्तला, आणि जनाबाईस तरुण वयांतच वैधव्य प्राप्त झालें. तेव्हां तिनें असा सत्संकल्प केला कीं पुनरपि प्रपंचप्रवेश न करितां एकाद्या योगिनीप्रमाणें राहून शाळेच्या कामास सर्वस्वीं वाहून घ्यावें.

शाळेचें काम करून आणखी दुसरा कांहींना कांहीं व्यवसाय धर्माजीराव करीत, व आपल्या कुटुंबाचा योगक्षेम चालवून शाळेचाहि खर्च जेमतेम भागवीत. परंतु वडिलांच्या पश्चात् थोड्याच दिवसांनीं समाधीच्या व्यवस्थापकांचा आणि त्यांचा कांहीं प्रकरणावरून बेबनाव येऊन त्यांच्या शाळेचा समाधीच्या जागेंतून उठावा झाला. असें करण्यांत त्या लोकांचा अर्थात् असा डाव होता कीं धर्माजीरावांना शाळेसाठीं भाडें भरून जागा घेण्याचें त्राण नसल्यामुळें ती बंद पडावी. परंतु धर्माजीरावांनीं

या विकट प्रसंगीं बिलकूल न डगमगतां आपली शाळा भाड्याच्या जागेंत नेली; आणि पूर्वींपेक्षांहि विशेष जोमानें चालविली. ते सगळा दिवस सारखे कष्ट करून थोडाबहुत पैसा मिळवून त्यावर स्वतांचा प्रपंच व शाळेचा खर्च भागवीत.

त्यांच्या विरोधी मंडळीचा वरील डाव फसला तेव्हां त्यांपैकीं जे अमळ विशेष सधन होते त्यांनीं एक मोफत शाळा समाधीच्या जागीं स्थापिली; ती अर्थात् अशा हेतूनें कीं धर्माजीरावांच्या शाळेंतलीं मुलें फुकट शिक्षणाच्या लालचीनें त्यांच्या शाळेंत यावीं; आणि त्यांचा हा उद्देश सिद्धीस जाण्याचा रंगहि दिसूं लागला. तेव्हां माधवरावांच्या कित्येक शिष्यांना व धर्माजीरावांच्या पक्षाच्या कित्येक लोकांना ही शाळा बुडूं न देण्यासाठीं थोडीबहुत झीज सोसणें आपलें कर्तव्य आहे असें वाटून त्यांनीं या वेळीं धर्माजीरावांना आपली शाळा मोफत करावयास लाविलें. तेव्हां अर्थात् शाळा बुडण्याची भीति नाहींशीं झाली; आणि प्रतिस्पर्ध्यांच्या शाळेंत फारशीं मुलें जमलीं नाहींत. ही स्पर्धा अवघी वर्ष दीडवर्ष केल्यावर त्यांच्या विरोध्यांचा धीर खचला, आणि ह्या कामीं लागणारी वर्गणी देण्याचें कित्येकांनीं नाकारिलें तेव्हां त्यांना ती शाळा बंद करावी लागली. या स्पर्धेत त्यांच्या गांठचे थोडेसे पैसे जाऊन एक दोन शिक्षकांचें बऱ्याच महिन्यांचें वेतन बुडविल्याची अपकीर्ति त्यांच्या वांट्यास आली. ह्याप्रमाणें प्रतिस्पर्ध्यांची शाळा बंद पडली तरी धर्माजी-रावांनीं आपली शाळा यापुढें मोफतच ठेविली. पुढें सतरा अठरा वर्षें त्यांनीं व त्यांच्या पश्चात् त्यांच्या भगिनी जनाबाई यांनीं मुलां-कडून फी न घेतां ही शाळा चालविली.

मागें सांगितलें आहेच कीं श्रीमती जनाबाईला सुइणीच्या कामांत जें कांहीं उत्पन्न होई तें सगळें ती धर्माजीरावांच्या हवालीं करी, आणि ते स्वत: त्यांत आपल्या इतर व्यवसायांतल्या उत्पन्नाची भर घालून स्वतांच्या

कुटुंबाचें पोषण व शाळेचा खर्च चालवीत. ह्या वेळीं इंप्रुवमेन्टट्रस्टचें काम मांडवीकडे चालू होऊन धर्माजीरावांना आपल्या शाळेचा थारे-पालट वेळोवेळां करावा लागला, आणि दर खेपेस अधिक अधिक भाडें द्यावें लागलें. तथापि त्यांनीं धैर्य न सोडतां व स्वतःच्या विपत्तीची परवा न करितां आपल्या वडिलांचें हें स्मारक आमरण कायम राखण्यासाठीं आत्मयज्ञ करण्याचा निश्चय केला; आणि तो कायम राखण्यास त्यांच्या दोघां भगिनींनीं त्यांना उत्कृष्ट साहाय्य केलें.

पुढें इंप्रुवमेन्टट्रस्टनें मांडवीकोळीवाडा येथें सिमेन्टच्या चाळी बांधिल्या तेव्हां त्यांतल्या एकीच्या अगदीं वरल्या मजल्यावर शाळेसाठीं खोल्या त्यांनीं मोठ्या खटपटीनें मिळविल्या. त्या मिळवून देण्याच्या कामीं डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनीं चांगली मदत केली.

ह्याप्रमाणें शाळा थोडक्या भाड्याच्या जागेंत आली, तरी तिचा खर्च एकंदर महर्घतेच्या मानानें वाढत चालला. तो भागविण्यासाठीं त्यांना फारच खटपट करावी लागे. त्यांच्या भगिनींच्या व बायकोच्या आंगावरील खुडूकनाडूक होतें तेंहि शाळेच्या भरीस घालावें लागलें. अशा विकट स्थितींत असतां त्यांच्यावर एक अतिघोर प्रसंग गुदरला. त्यांच्या शाळेचा केवळ आधारस्तंभ अशी जी त्यांची परम प्रिय भगिनी अहल्याबाई तिचें देहावसन झालें. ही माउली बरेच दिवस क्षय-रोगानें आजारी होती, तरी मुलांना शिकविण्याचें काम किंबहुना सगळी शाळा संभाळण्याचें काम तिनें आमरण चालविलें. कारण तिला आपल्या वडिलांची ही शाळा सदोदित नीट चालावी असा अभिमान असे. शाळा तपासावयास येणारे सरकारी कामदार त्यांच्या शाळेची व विशेषतः अहल्याबाईच्या शिक्षणपद्धतीची नेहमीं तारीफ करीत. शाळेंत येणाऱ्या प्रत्येक मुलावर अहल्याबाई पोटच्या लेकरा-प्रमाणें प्रेम करी, तें इतकें कीं त्यांतलें एकादें मूल आजारी पडल्याचें

तिला कळलें तर ती स्वतः त्याच्या बिऱ्हाडीं जाऊन त्याच्या औषधपाण्याची तजवीज करीत असे. ती वारली तेव्हां तिच्या प्रेतासभोंवतीं शाळेंतल्या मुलांनीं व इतर माणसांनीं जमा होऊन आपली प्रेमळ माता गमावल्याप्रमाणें शोक केला.

अहिल्याबाईच्या निधनानंतर धर्माजीरावांना एक शिक्षक जास्त ठेवणें भाग झालें, तेव्हां अर्थात् तेवढा शाळेचा खर्च अधिक वाढला. परंतु ते या वेळींहि डगमगले नाहींत. त्यांनीं प्रो. वेलनकरांच्या व इतर कांहीं थोर गृहस्थांच्या शिफारशीनें वाडियाच्या धर्मफंडांतून शाळेसाठीं दरमहा तीस रुपयांची मदत तीन वर्षांच्या मुदतीनें मिळविली; आणि जनाबाईच्याहि धंद्याचा जम चांगला बसून मोठमोठ्या कुटुंबांत तिला चांगल्या किफायतीचें काम मिळूं लागलें. तेव्हां धर्माजीरावांना मोठा हुरूप आला. वाडियाच्या धर्मफंडांतून मिळणाऱ्या मदतीची मुदत संपली तेव्हां त्यांनीं ती पुढें मोठ्या प्रमाणावर चालू ठेवण्याविषयीं त्या फंडाच्या ट्रस्टींना अर्ज केला; आणि त्यांच्याकडून दरमहा पन्नास रुपयांची मदत मिळूं लागली. ही मदत मिळूं लागल्यानंतर धर्माजीरावांनीं आपल्या शाळेंतील मुलांना चित्रकलेचें व सुताराचें काम शिकविण्याची तरतूद केली. आणखी तीन वर्षांनीं मदत चालू ठेवून ती वाढविण्याविषयीं त्यांनीं वाडियाच्या धर्मफंडाच्या ट्रस्टींकडे अर्ज केला. ह्या वेळीं मि. एस्. एम्. एडवर्डस पोलिस कमिशनर होते; त्यांनीं शाळेच्या एका वार्षिक बक्षीससमारंभाच्या वेळीं अध्यक्ष होऊन तिच्या उपयुक्ततेविषयीं खात्री करून घेतली आणि संदरहू ट्रस्टींकडे चांगली शिफारस केली. तीमुळें त्यांच्याकडून दरमहा शंभर रुपयांची मदत मिळूं लागली. ही मदत पांच वर्षांच्या मुदतीची होती. ही मुदत संपल्यानंतर लौकरच शाळा म्युनिसिपल स्कूल्स कमिटीच्या हवालीं करण्यांत आली, तेव्हां अर्थात् ट्रस्टींकडच्या मदतीची अपेक्षा उरली नाहीं.

ही अशी मदत मिळूं लागून शाळेच्या खर्चासंबंधाची वरीच काळजी दूर झाली. नंतर लौकरच धर्माजीरावांना इन्फ्लुएन्झाचा आजार होऊन त्यांत त्यांचा अंत झाला ! आणि शाळा चालू ठेवण्याचा सगळा बोजा एकट्या जनावाईच्या शिरीं आला. परंतु तिनें मुळीं न डगमगतां आपल्या भावंडांचें सुव्रत पुढें चालविण्याचा निर्धार केला. ह्या संकटाच्या वेळीं तिला तिच्या भाच्याचा चांगला आधार मिळाला. त्याचें नांव मारुति गोविंद बोऱ्हाडे. त्यांचें लाडकें नांव बाबुराव असें आहे. त्याला त्याच्या मामानें म्हणजे धर्माजीरावांनीं लहानाचा मोठा करून आपल्या शाळेंत प्राथमिक शिक्षण देऊन इंग्रजी शाळेंत पाठविलें. तेथें सहा इयत्तांपर्यंत त्याचें शिक्षण झालें. पुढें श्रीमती अहल्याबाई गत झाल्यानंतर धर्माजीरावांनीं त्याला शाळेंतून काढून आपल्या शाळेंत शिकवावयास ठेविलें. त्यानें हें काम मोठ्या आस्थेनें व उत्साहानें केलें आणि शाळेची अब्रू राखिली. प्रतिवर्षी मराठी चौथे इयत्तेच्या परीक्षेस ह्या शाळेंतून जाणारीं बहुतेक मुलें पास होत असत. ह्यामुळें शाळेला व बाबूरावांच्या कामाला इन्स्पेक्टरांकडून नेहमीं चांगला शेरा मिळे. मामांचें निधन झाल्यावर बाबुरावांनीं शाळेचें काम मोठ्या हुशारीनें व दक्षतेनें चालवून आपली मावशी जनाबाई हिला कोणत्याहि बाबतींत कसलीहि अडचण पडूं दिली नाहीं.

रा. बाबूरावांप्रमाणेंच आणखी एका शिक्षकाची श्रीमती जनाबाईला शाळा सुस्थितींत ठेवण्याला मदत झाली. त्यांचें नांव रघुनाथ कानशेट रसाळ असें आहे. यांना धर्माजीरावांनीं चित्रकला व कार्पेन्टरी शिकविण्यासाठीं शिक्षक नेमिलें. हे रत्नागिरीच्या धंदेशिक्षणाच्या शाळेंत शिकून परीक्षा पास झाले होते. त्यांनीं ह्या शाळेंत पाय ठेवल्यापासून हिच्या संबंधानें त्यांच्या ठायीं आपलेपणाची बुद्धि निर्माण होऊन ते तिची व्यवस्था नीट चालेसें करण्यास मनापासून झटूं लागले. धर्माजीरावांच्या पश्चात् शाळेच्या चांगुल-



श्रीमती जनाबाई रोकडे.

Lakshmi Art, Bombay, 8.

पणाचें बरेंचसें यश रा. रसाळांना दिलें पाहिजे. हल्लीं ही शाळा म्युनिसिपल स्कुल्स–कमिटीच्या ताब्यांत गेली आहे, तरी श्री. जनाबाईच्या आग्रहावरून रा. बाबुराव व रा. रसाळ यांना ह्या शाळेंत पूर्वीच्याच कामावर कायम केलें आहे; आणि अजूनपर्यंत श्रीमती जनाबाईप्रमाणें ह्या उभयतांच्या मनांतील शाळेच्या संबंधाची आपलेपणाची बुद्धि कायम राहिली आहे.

धर्माजीरावांच्या निधनानंतर श्री. जनाबाईला असें वाटूं लागलें कीं आपल्या प्रिय बंधूची जी गत अकालीं झाली तीच आपलीहि होण्याचा संभव आहे; आणि मग आपल्या वडिलांनीं पाजळलेली ही ज्ञानरूप प्रकाशाची दिवटी, जिला आपल्या अत्यंत प्रिय भावंडांनीं जीवितरूप तेलानें इतकीं वर्षें तेवत ठेविली, ती आपल्या पश्चात् मालवून आपल्या परमपूज्य वडिलांचें कांहीं एक स्मारक उरणार नाहीं. ही अशी अनिष्ट अवस्था न व्हावी म्हणून आपल्या हातून काय होईल ती खटपट करावी असा तिनें संकल्प केला, आणि तिच्या वडिलांचे कांहीं शिष्य व मित्र व तिच्या बंधूंचे स्नेही यांच्या साहाय्यानें तिनें शाळेला कायमचें स्वरूप देण्याच्या सदुद्देशानें फंड जमविण्याची खटपट चालविली; आणि कांहीं उदार महाराजांकडून व धनिक सदगृहस्थांकडून सुमारें सव्वीस हजार रुपये फंड तिनें एका वर्षाच्या अवधींत जमा केला. त्यापैकीं मुंबईच्या म्युनिसिपल स्कूल्स कमिटीला रु. २५१०० देऊन शाळा तिच्या स्वाधीन केली. ती अशा अटींवर कीं त्या कमिटीनें शाळांसाठीं कोळीवाड्यांत बांधलेल्या नवीन इमारतींत ही शाळा ठेवून आपले पूज्य तीर्थरूप माधवराव रोकडे यांच्या नावानें ती फुकट चालवावी; आणि तींत धंदेशिक्षणाचीहि व्यवस्था ठेवावी. ह्या अटींबरहुकूम ही शाळा सांप्रत स्कूल्स–कमिटीनें चालू ठेविली आहे. हा एवढा फंड जमविण्याच्या कामीं श्रीमंत खासेसाहेब पवार, कै. गणपतराव गोडाजी काळे, कै. रावसाहेब काशीनाथ रामकृष्ण कोरगांवकर, रावसाहेब हरिश्चंद्र

विश्राम राजवाडकर इत्यादि सद्गृहस्थांनीं चांगलें साहाय्य केलें. शाळेला येणेंप्रमाणें कायमपणा येऊन आपल्या वडिलांचें स्मारक चिरकाल राहील अशी व्यवस्था केल्यावर अर्थात् जनाबाईची एक मोठी काळजी दूर झाली; आणि आपण पितृऋणांतून अंशतः तरी उतराई झाल्याबद्दल तिच्या जिवाला समाधान वाटलें असावें यांत शंका नाहीं.

परंतु परोपकारासाठीं अहर्निश झटण्याचा जो उज्ज्वल स्फूर्तिप्रद कित्ता तिच्या वडिलांनीं घालून दिला होता तो वळवीत राहण्याची जी तिला इतकीं वर्षें सतत लागलेली संवय ती बंद पडल्यानें तिला चैन पडेनासें झालें. आपल्या वडिलांच्या खालोखाल जिची योग्यता अशी जी तिची वहीण अहल्याबाई, तिनें शाळेसाठीं केलेल्या अप्रतिम आत्मयज्ञास्तव तिचेंहि एक स्मारक करावें असें तिच्या मनांत आलें. तिनें पुष्कळ वर्षें चालविलेल्या सुइणीच्या धंद्यांत तिला गरिबांच्या गर्भार बायांचे बाळंतपणीं किती हाल होतात ते प्रत्यक्ष पाहावयाची संधि बरीच आल्यामुळें त्यांच्यासाठीं आधुनिक शास्त्रीय पद्धतीचें एक लहानसें सूतिकागृह काढावेंसें तिला वाटलें, आणि असें एक गृह ट्रस्टच्या चाळींतील शाळा जाऊन रिकाम्या झालेल्या खोल्यांत तिनें अहल्याबाईच्या नावानें सुरू केलें आहे. तें आज तीन वर्षें सुंदर रीतीनें चाललें आहे. त्याचा बहुतेक सगळा खर्च श्रीमती जनाबाईच चालविते.

प्रिय भगिनी अहल्याबाईप्रमाणेंच आपला प्रिय बंधु धर्माजी राव याचेंहि एक स्मारक तिनें केलें आहे. त्याच्या नावानें एक ग्रंथालय तिनें शाळेच्या जागीं स्थापिलें आहे. त्यांत ती प्रतिवर्षी नव्या पुस्तकांची भर घालीत आहे; आणि त्याचा उपयोग पुष्कळ तरुण मंडळीस चांगला होऊं लागला आहे. आपल्या परमपूज्य वडिलांच्या स्मारकाप्रमाणें आपल्या ह्या परमप्रिय भावंडांचीं स्मारकेंहि कायम करण्यापुरतें सामर्थ्य व आयुरारोग्य श्रीमती जनाबाईस प्राप्त होवो, असें मनःपूर्वक इच्छून हा लेख समाप्त करितों.

२०५